महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः २४, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १० सप्टेंबर २०२४ ते सोमवार १६ सप्टेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301


## संक्षिप्त

### कोणाला पाडायचे - विजयी करायचे ओबीसी समाजाचे ठरले - लक्ष्मण हाके

■ सांगली : सम्यक कासारे

विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाज निर्णायक भूमिका बजावणार असून कोणाला पाडायचे आणि कोणाला विजयी करायचे



हे ठरले असल्याचे ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांनी सांगलीत मेळाव्यात सांगितले. ओबीसी समाजाची संघटनात्मक बांधणी आणि भविष्यातील ओबीसी आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी हरिप्रिया मंगल कार्यालयात पार पडली. या बैठकीत हाके बोलत होते. यावेळी समन्वयक संजय विभुते, माजी महापौर संगीता खोत, माजी नगरसेवक विष्णू माने, सविता मदने, कविता कोळेकर, राजेंद्र कुंभार, विठ्ठल खोत, जगन्नाथ माळी आदींसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. हाके म्हणाले, आगामी विधानसभा निवडणुकीत बहुसंख्य असणाऱ्या ओबीसी समाजाला वेगवेगळ्या पक्षांतून किती उमेदवारी मिळते, हे आम्ही पाहत आहोत.

### 'नवा अहवाल सादर करा', कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे सीबीआयला पुन्हा निर्देश!


■ कोलकाता : वृत्तसंस्था

कोलकात्याच्या आर. जी. कर वैद्यकयी महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी तपासाबाबत नव्याने स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सीबीआयला दिले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड



म्हणाले, 'सीबीआयने स्टेटस रिपोर्ट दाखल केला आहे. परंतु, याप्रकरणी अद्यापही तपास चालू आहे. आम्ही सीबीआयला नवीन स्टेटस रिपोर्ट दाखल करण्याचे निर्देश देतो.' कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली होती. याप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, 'आम्ही मंगळवारी नवा अहवाल पाहू. सीबीआय तपास करत आहे. त्यामुळे आम्ही सीबीआयला तपासाबाबत मार्गदर्शन करू इच्छित नाही. सीबीआयने स्टेटस रिपोर्ट सादर केल्यानंतर या अनैसर्गिक मृत्यू अहवालाच्या वेळेबाबताही न्यायालयाने स्पष्टीकरण मागितले आहे. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी खंडपीठाला सांगितले की, मृत्यू प्रमाणपत्र दुपारी १.४७ वाजता जारी करण्यात आले, तर पोलिसांनी २.५५ वाजता अनैसर्गिक मृत्यूची नोंद केली.'

# आत्महत्येचे प्रमाण अधिक म्हणून मराठा समाजाला मागास म्हणू शकत नाही



**■ मुंबई : विशाल कारंडे- एखाद्या समाजातील नागरिकांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण अधिक आहे म्हणून तो समाज मागास आहे, असे म्हणता येणार नाही. शिवाय, आत्महत्या आणि आरक्षण देण्याचा संबंध नाही, असा दावा मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण देण्याला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांतर्फे गुरूवारी उच्च न्यायालयात करण्यात आला.**

निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेल्या अहवालात मराठा समाज हा तीन दशके मागे पडल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. असामान्य अथवा असाधारण परिस्थिती निर्माण झाली नसतानाही मराठा समाजाला आरक्षण देण्याचा घाट घातला जात असल्याच्या आरोपाचा याचिकाकर्त्यांच्या वतीने पुनरूच्चार करण्यात आला. मराठा समाजात आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे, असे आयोगाने म्हटले आहे. परंतु, आत्महत्या मागास असल्यानेच केल्या जातात असे नाही. त्याची वेगवेगळी कारणे आहेत. ती आयोगाने दिलेली नाहीत, असेही याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, एखादा गट गेल्या काही वर्षांपासून मुख्य प्रवाहातून बाहेर फेकला जाऊन अडचणींचा सामना करत असल्यास त्याला संरक्षण करण्यासाठी त्या गटाला आरक्षण दिले जाते. मराठा समाजाचे असे नाही, असेही याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. हमाल, डबेवाले हे मागासलेल्या वर्गात येतात. पण मराठा समाजातील किती जण हमाल आणि डबेवाले आहेत, असा प्रश्नही संचेती यांनी मराठा समाजाला मागास ठरवण्याच्या शुक्रे आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करताना केला.

(शेष पृष्ठ २ वर)

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय; २००० रुपयांपर्यंतच्या पेमेंटवर द्यावा लागणार १८ टक्के कर

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

वस्तू व सेवा कर परिषदेची म्हणजेच जीएसटी काऊन्सिलची ५४ वी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांबाबत आजच्या बैठकीत मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो. डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे २,००० रुपयांपर्यंतचे जे छोटे व्यवहार केले जातात त्यासाठी बिलडेस्क व सीसीएव्हेन्यू सारख्या पेमेंट ॲग्रीगेटर्सवर १८ टक्के जीएसटी लागू करण्याचा विचार केला जात आहे. जीएसटी परिषदेने याबाबतचा निर्णय घेतल्यास डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे पैसे भरणं




महागात पडू शकतं. बिझनेस टुडेच्या वृत्तानुसार जीएसटी परिषदेच्या आजच्या बैठकीत जीएसटी समितीने डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांवर कर आकारण्याची शिफारस केली आहे. हे करत असताना समितीने असा युक्तिवाद केला आहे की पेमेंट ॲग्रीगेटर्स हे अशा आर्थिक व्यवहारांमध्ये मध्यस्थ म्हणून काम करतात. त्यांच्याकडे बँक म्हणून पाहू नये. याचाच अर्थ जीएसटी समिती पेमेंट ॲग्रीगेटर्सवर कर लावण्याच्या विचारात आहे. सध्या या पेमेंट ॲग्रीगेटर्सना २,००० रुपयांपेक्षा कमी रकमेच्या व्यवहारांवर जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र सरकार आता ही सूट काढून त्याऐवजी १८ टक्के जीएसटी लावण्याच्या विचारात आहे. भारतात दररोज होत असलेल्या डिजिटल पेमेंट्सपैकी ८० टक्क्याहून अधिक व्यवहार हे २,००० रुपयांपेक्षा कमी किंमतीचे असतात. २०१६ मध्ये नोटबंदीच्या काळात केंद्र सरकारने एक अधिसूचना काढून पेमेंट ॲग्रीगेटर्सकडून कर न आकारण्याचा निर्णय जाहीर केला होता. हे पेमेंट ॲग्रीगेटर्स सध्या व्यापाऱ्यांकडून प्रत्येक व्यवहारामागे ०.५ टक्के ते २ टक्के पैसे आकारतात.

## गणराया 'सार्वजनिक आरोग्य व्यवस्था' होऊ दे 'लाडकी'!

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

राज्यातील महायुती सरकारकडून 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा सध्या प्रचंड गाजावाजा सुरु असून यावर होणाऱ्या खर्चाच्या एक दशांश खर्च जरी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर करण्यात आला तर सार्वजनिक आरोग्य सेवा लाखो गोरगरीब रुग्णांसाठी 'लाडकी' बनू शकेल असे आरोग्य क्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे तसेच जिल्हा रुग्णालयांचे बळकटीकरण करतानाच आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद व डॉक्टरांची रिक्त पदे सरकारने भरली तर सर्व लाडक्या बहिणी तसेच भाऊ खऱ्या अर्थाने सुखी होतील असा विश्वासही या डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. राज्यातील



तसेच केंद्रातील सरकारकडून आरोग्य व्यवस्थेवर सकल राज्य वा राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघा १.९ टक्के खर्च करण्यात येतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ४ टक्के रक्कम ही आरोग्य व्यवस्थेवर खर्च होणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१७-२२ साठीच्या जाहीर केलेल्या आरोग्य जाहिरनाम्यात अर्थसंकल्पाच्या किमान अडीच टक्के रक्कम आरोग्यवर खर्च करण्याची भूमिका घेतली होती. प्रत्यक्षात आज २०२४ सालीही आरोग्यावर केंद्राकडून जेमतेम दोन टक्के रक्कम खर्च करण्यात येत आहे. बरेचदा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयात प्रभावी उपचार मिळणार नाही, असे वाटल्यामुळे रुग्ण खाजगी रुग्णालयात दाखल होतो.

## 'किमान तुमच्या घरात तरी मातृभाषेत बोला, अन्यथा...', अमित शाह यांचं भाषेबाबत महत्वाचं आवाहन

■ मुंबई : गणेश बागडे

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आहेत. ते रविवारी मुंबईत दाखल झाले. आज अमित शाह लालबागच्या राजाचं राजाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर ते देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर गणपती बाप्पांचे दर्शन करण्यासाठी जातील. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या निवासस्थानी गणपतीच्या दर्शनासाठी जाणार आहेत. दरम्यान, अमित शाह रविवारी मुंबईत दाखल झाल्यानंतर त्यांनी एका खासगी कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी बोलताना त्यांनी मातृभाषेबाबत भाष्य केलं. 'घरात मातृभाषेमधून बोललं पाहिजे', असं अमित शाह यांनी म्हटलं आहे. माझ्या घरातही दोन माझे नातवडं



आहेत. त्यांनी संस्कृत किंवा गुजराती भाषा शिकावी यासाठी मी त्यांना वेळ देतो. तसेच त्यांच्या शाळेत जाऊनही चर्चा करत असतो. त्यांच्या शाळेचे शिक्षक भाषा आणि भाषेचं व्याकरण व्यवस्थित शिकवतात की नाही हे देखील पाहत असतो. मी आपल्या सर्वांना एक आवाहन करू इच्छितो की, कमीत कमी आपल्या घरात तरी आपली मातृभाषेतून बोला. त्यामुळे आपल्या मातृभाषेला आपली मुलं पुढे घेऊन जातील. अन्यथा एक दिवस असा येईल की देशात आपल्याला मोठ्या संख्येने वृद्धश्रम काढण्याची वेळ येईल. याचं कारण म्हणजे घरामध्ये नातू मातृभाषेत बोलला नाही तर नातवाचं आणि आजोबाचं नातं कसं जोडणार? त्यामुळे मातृभाषा बोलणं गरजेचं आहे', असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

## गोराई, चारकोप, मालवणीतील जागतिक बँक प्रकल्पातील रहिवाशांना दिलासा

■ मुंबई : नितीन देवळेकर

जागतिक बँक प्रकल्पातील गोराई, चारकोप आणि मालवणीतील अत्यल्प व अल्प गटातील रहिवाशांना अखेर अतिरिक्त चटईक्षेत्रफळ मोफत उपलब्ध होणार आहे. याबाबतचा निर्णय वर्षभरापूर्वी तत्कालीन म्हाडा उपाध्यक्षांनी घेतला होता. मात्र त्याची आता अंमलबजावणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे निवासयोग्य प्रमाणपत्र मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक बांधकामांना अतिरिक्त चटईक्षेत्रफळापोटी अधिमूल्य भरण्यापासून दिलासा मिळाला आहे.

गोराई तीन, चारकोप-कांदिवली येथील सेक्टर क्रमांक आठ व नऊ आणि मालवणी-मालाड येथील जागतिक बँक प्रकल्पांतर्गत ज्या प्रकल्पधारकांना वा सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्टा करताना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू झाले आहे त्यांनाच हा लाभ मिळणार आहे. उर्वरित जागतिक बँक प्रकल्पधारकांना मात्र हा लाभ



लागू होणार नाही, असे म्हाडा अधिकाऱ्याने स्पष्ट केले. या रहिवाशांना करारनामा करताना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू करण्यात आले होते. पॉईंट ८५ मोफत तर पॉईंट ६५ अधिमूल्य भरून उपलब्ध करून देण्यात आले होते. या रहिवाशांनी तळमजल्याचे बांधकाम करून पॉईंट ८५ चटईक्षेत्रफळ वापरले होते. त्यावर पॉइंट ६५ चटईक्षेत्रफळाइतका मजला चढविला होता. तो अधिमूल्य न आकारता नियमित करावा अशी मागणी करण्यात आली होती. ती मान्य करण्यात आली आहे. १९८५ ते १९९५ या काळात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मुंबई नागरी विकास प्रकल्प राबविण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने अत्यल्प आणि अल्प गटातील संकुल भूखंडाचे वितरण करण्यात आले. या संकुल भूखंडामध्ये २१, २५, ३० आणि ४० चौरस मीटर इतक्या आकाराच्या भूखंडांचा समावेश होता. १९८७ मधील शासन निर्णयानुसार अत्यल्प व अल्प गटातील या भूखंडांना पॉईंट ८५ इतके चटईक्षेत्रफळ लागू होते. मात्र गोराई तीन, चारकोप सेक्टर आठ व नऊ आणि मालवणी मालाड येथील अभिन्यास १.२ चटईक्षेत्रफळानुसार मंजूर झाले असून त्यामधील संकुल भूखंडांना दीड इतके चटईक्षेत्रफळ लागू करण्यात आले.








## 'विश्वास' पुन्हा पडला

अनेकदा सर्वोच्च पदांवरील नेते, न्यायाधीश आणि नोकरशहांना त्यांचा कार्यकाल उरकल्यानंतर सत्य आणि यथार्थाचे स्मरण होते. प्रस्थापित व्यवस्थेतील आपल्या स्थानाला धक्का बसेल, या भीतीमुळे महत्त्वाच्या पदांवर असताना 'सत्याचे प्रयोग' करणे बरेचदा परवडणारेही नसते. पण निवृत्तीनंतर मात्र ही मंडळी देशहिताचे, व्यवस्था परिवर्तनाचे बोधामृत मोकळेपणाने जनतेला पाजतात. केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे मात्र याबाबतीत अपवाद म्हणावे लागतील. गडकरी राजकारणात राहूनही स्पष्टवक्तेपणा दाखवितात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात भाजपची सत्ता आल्यानंतर बहुतांश नेत्यांच्या बिनधास्त बोलण्याच्या वृत्तीला चांगलीच वेसण लागली. पण कठोर शिस्तीला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या नव्या भाजपमध्येही गडकरींनी आपले वैशिष्ट्य कायम राखले आहे. सध्याच्या परिस्थितीत राजकीय नेते, राजकारणी यांची विश्वासार्हताच कमी झाली आहे, असे रोखठोक प्रतिपादन करून गडकरी मोकळे झाले. नेत्यांबद्दल जनतेच्या मनातला रोष आणि संधी न देणाऱ्या पक्षश्रेष्ठींबद्दलची कार्यकर्त्यांच्या मनातील खदखद स्वतःच जाहीरपणे व्यक्त करुन गडकरी एकप्रकारे प्रेशर कुकरच्या शिट्टीचे काम करीत आहेत, असे म्हणता येईल. 'अच्छे घोडे को नही है घास, गधे खा रहे च्यवनप्राश' अशा शब्दांत



जागल्याची भूमिका बजावताना ते पक्षात कार्यकर्त्यांची होणारी हेळसांड अधोरेखित करतात. भविष्यातील तंत्रज्ञान आणि होणारे प्रकल्प यांविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदींप्रमाणे गडकरीही मोठमोठी स्वप्ने दाखवितात, याचीही त्यांना आठवण करून द्यायला हवी.

आपल्या पाठीशी 'महाशक्ती' असल्याचे जाहीरपणे सांगणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याप्रमाणे गडकरी यांच्याही मागे 'अदृश्य शक्ती' असणार. त्यामुळेच प्रस्थापितांचा मुलाहिजा न बाळगता जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या मनातल्या भावना मांडण्याचे ते धाडस दाखवू शकतात. सध्या हरियानात विधानसभा निवडणुकीच्या तिकीटवाटपात 'च्यवनप्राश' खाणारे लाभार्थी पक्षाच्या विचारधारेचे नाहीत, या पक्षनिष्ठांच्या हतबलतेची किनार कदाचित गडकरींच्या विधानाला असू शकते. सर्वसामान्यांचा विश्वास संपादन करणे ही तपश्चर्याच असते. पण ऐन मोक्याच्या वेळी सत्तेची मेनका पुढ्यात येऊन राजकीय नेत्याची तपश्चर्या भंग करते. गेल्या काही वर्षात अनेक प्रस्थापित आणि उद्योन्मुख नेत्यांची सत्तेच्या 'मेनके'ने अशी अवस्था केल्यामुळे केवळ त्यांचीच नाही, तर त्यांना जवळ करणाऱ्या पक्षांचीही विश्वासार्हता ढासळली आहे. त्यात भर पडली आहे ती समाजमाध्यमांची. त्या माध्यमांतून जनतेशी संवाद साधणाऱ्या राजकीय नेत्यांची जमिनीशी असावी लागणारी नाळ क्षीण झाली आहे. आभासी माध्यमांतून जनमानसात विश्वासार्हता रुजत नसल्याची, उशिराने का होईना जाणीव झाल्याने अनेक नेत्यांनी प्रत्यक्ष जनसंपर्कावर भर द्यायला सुरुवात केली. नेते जसे बोलतात, तसे करत नाहीत, ही सर्वसामान्यांची धारणा झाली आहे. आणि ती योग्यच आहे.

## आत्महत्येचे प्रमाण अधिक म्हणून...

**(पान १ वरुन)** मराठा समाजाचे केवळ खुल्या प्रवर्गासह तुलना केल्यानंतर ते मागास असल्याचे दिसणारच, असेही संचेती यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, लोकसंख्या हा आरक्षणाचा निकष असू शकत नसल्याचे न्यायालयाला सांगितले. एखाद्या जातीचे किंवा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी दर दहा वर्षांनी सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द ठरवताना स्पष्ट केले होते. अनुसूचित जाती-जमातींतील कोणत्या जाती अधिक मागास किंवा कमी मागास याचे सर्वेक्षण करण्याचे आणि त्यानुसार आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिला. सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट करूनही मराठा समाजाला मागास ठरवण्यासाठी त्यांची तुलना केवळ खुल्या प्रवर्गाशी केली जात आहे, असा दावा देखील याचिकाकर्त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण घटनाबाह्य असल्याचे न्यायालयाला सांगताना केला. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या विशेष पूर्णपीठासमोर सध्या या प्रकरणी सुनावणी सुरू आहे.

# निकालांची सावली महाराष्ट्रावरही?


**लोकसभा निवडणुकीप्रमाणेच हरियाना, जम्मू-काश्मीर या राज्यांत मतांचे विभाजन न होता भाजप आणि विरोधी आघाडीत सरळ लढती होतील, असा रागरंग आहे. या दोन राज्यांतील निवडणुकीच्या निकालांचा प्रभाव महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुकांवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. जम्मू आणि काश्मीर व हरियाना विधानसभेच्या निवडणुका महाराष्ट्रासाठी महत्त्वाच्या आहेत. याचे कारण या निवडणुकांच्या निकालांवरुन वारे कोणत्या दिशेने वाहात आहेत, हे स्पष्ट होऊन त्यांचा महाराष्ट्र व झारखंडच्या निवडणुकांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कलम ३७० रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या पाच वर्षांपूर्वीच्या निर्णयावर जम्मू आणि काश्मीर तसेच लडाखमधील लोकसभा निवडणूक लढणाऱ्या भाजपला सहापैकी दोनच जागा जिंकता आल्या.**

अयोध्येत भव्य राम मंदिराची उभारणी करुनही भाजपचा बहुमताचा पाया खचला. कलम ३७० आणि राम मंदिर हे दोन्ही भावनिक मुद्दे लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळवून देऊ शकले नाहीत. रद्द केलेले कलम ३७० विरुद्ध रद्द केलेला पूर्ण राज्याचा दर्जा या दोन मुद्यांवरुन जम्मू आणि काश्मीरच्या निवडणुकीत जनमताचा कौल निश्चित होणार आहे.

जम्मू आणि काश्मीरचे निकाल केंद्रातील सत्ताधीशांच्या अपेक्षेनुरुप येणार नाहीत, असे देशवासीयांनी गृहीतच धरलेले असते. अशा स्थितीत एकट्या जम्मू आणि काश्मीरमध्येच निवडणूक होऊन निकाल अनुकूल लागला नसता तरी त्याचा जनमानसावर फारसा परिणाम झाला नसता.

पण हरियानासोबत निवडणूक जाहीर करुन निवडणूक आयोगाने देशवासीयांच्या मूडचे आकलन करण्याच्या बाबतीत जम्मू आणि काश्मीरला हरयानाला जोडल्याने या दोन राज्यांतील जनतेचा मूड महाराष्ट्र आणि झारखंड या पुढच्या दोन राज्यांमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी महत्त्वाचा ठरू शकतो.

जम्मू आणि काश्मीरच्या विधानसभा निवडणुकीवरील काश्मीर खोऱ्याचे वर्चस्व कमी व्हावे म्हणून मतदारसंघांची पुनर्रचना करुन जम्मूच्या जागा वाढवून ३७ वरुन ४३ करण्यात आल्या. शिवाय अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या सात जागांसोबत अनुसूचित जमातींसाठी नऊ राखीव जागांची भर घालण्यात आली. राज्यातील परप्रांतीयांना मतदानाचा हक्क देण्यात आला.




त्यामुळे दहा वर्षात मतदारांची संख्या ७३ लाखांवरुन ८८ लाख ६७ हजारांवर पोहोचली. दहा वर्षांपूर्वी एकट्या जम्मू विभागात ३७ पैकी २५ जागा जिंकल्यामुळे भाजपची बहुमताची सत्ता आणून राज्याला पहिला हिंदू मुख्यमंत्री देण्याच्या दिशेने हे सर्व बदल झाले. पण यंदा जम्मूमध्येच भाजपमध्ये बंडखोरी बघायला मिळत आहे. काश्मीर खोऱ्यात लोकसभेची निवडणूक न लढणाऱ्या भाजपने विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांना भरभरुन उमेदवारी दिली आहे. त्याचा कितपत फायदा होईल, हे निकालांतून दिसेलच. शिवाय नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत २४.३६ टक्के मते मिळविणाऱ्या भाजपचा सामना यंदा नॅशनल कॉन्फरन्स (२२.३० टक्के) आणि काँग्रेस (१९.३८ टक्के) यांच्या ४१.६८ टक्के मतांच्या बेरजेशी आहे. कलम ३७० रद्द होताना गमावलेली स्वायत्तता आणि पर्यटनाला चालना मिळूनही तरुणांमधील वाढत्या बेरोजगारीचे मुद्दे या निवडणुकीत महत्त्वाचे ठरु पाहात आहेत.

हरियानामध्ये दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या भाजपची काँग्रेसशी सरळ लढत आहे. लोकसभा निवडणूक हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरणाने जिंकणारा भाजप हरयाणात विजयासाठी जाटविरुद्ध गैरजाट फॉर्म्युला वापरताना दिसत आहे. अनेक कारणांनी पक्ष चिंतेत आहे. मतदानाच्या दिवसापर्यंत काँग्रेसमधील बेदिली शिगेवर पोहोचल्यास हे चित्र बदलू शकते. हरियानामध्ये २००५ मध्ये काँग्रेस पक्ष ९० पैकी ६७ जागा जिंकून सत्तेत आला. त्यानंतर २००९मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत संख्याबळ घटून ४० वर आलेल्या काँग्रेसला अल्पमतातील सरकार चालवावे लागले. २०१४मध्ये पंतप्रधान मोदी यांच्या लोकप्रियतेच्या लाटेवर भाजपने ९० पैकी ४७ जागा जिंकून हरियानामध्ये प्रथमच पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन केले. पण २०१९ मध्ये भाजपचेही संख्याबळ घटून ४० वर आले आणि अल्पमताचे सरकार चालवावे लागले. गेल्या दोन दशकातील हरियानातील सत्तेचे हे पॅटर्न त्याच पद्धतीने पुढेही कायम राहीलच, याची शाश्वती नसली तरी मतदारांचा मूड मात्र तसेच संकेत देत आहे.

### निष्ठावंतांचा कोंडमारा

मागच्या पाच वर्षातील शेतकऱ्यांचे आंदोलन आणि ऑलिंपिक पदकविजेत्या महिला कुस्तीपटूंच्या कथित शोषणाची दखल न घेणाऱ्या भाजपविरोधातील रोष पॅरिस ऑलिंपिकमध्ये हुकलेल्या विनेश फोगाटच्या हमखास रौप्यपदकामुळे आणखीच वाढला आहे. यंदा लोकसभा निवडणुकीत हरियानामध्ये भाजपचे संख्याबळ १० वरुन पाचवर आले.

भाजप आणि काँग्रेसमधील मतांचे अंतर सहा टक्क्यांनी घटून २.४४ टक्के इतकेच उरले. विधानसभेतील तिकीट वाटपावरुन हरियाना भाजपमध्ये जम्मूपेक्षाही जास्त उद्रेक बघायला मिळत आहे. बहुसंख्य उमेदवारांचा भाजपच्या विचारधारेशी कवडीचाही संबंध नसल्यामुळे निष्ठावंतांचा कोंडमारा झाला आहे.

जम्मू आणि काश्मीरप्रमाणेच हरियानामध्येही बेरोजगारी, विशेषतः सरकारी नोकरभरतीतील अनास्था तरुणांना अस्वस्थ करणारी ठरली आहे. पंधरा हजार रुपये पगार असलेल्या कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या पाच हजार पदांसाठी ४६ हजार पदव्युत्तर आणि पदवीधरांनी केलेल्या अर्जांमुळे वातावरण आणखीच ढवळून निघाले आहे. भाजपसाठी जम्मू आणि काश्मीर आणि हरियानामध्ये अनुकूल वातावरण राहिलेले नाही.

केंद्रातील आणि हरियानातील भाजप सरकारांनी दिल्लीवर चाल करुन येणाऱ्या पंजाबमधील शेतकऱ्यांना पंजाब-हरियाना शंभू बॉर्डरवर दोनशेहून अधिक दिवसांपासून सुरक्षा दल आणि अडथळ्यांच्या जोरावर थोपवून धरले आहे. पण आठ ऑक्टोबर रोजी लागणाऱ्या निकालांनंतर हरियानामध्ये सत्तांतर झाल्यास त्याची वैधता संपुष्टात येऊ शकते.

तसे झाल्यास शंभू बॉर्डरचा 'बांध' फुटेल आणि पंजाबपासून दिल्लीपर्यंतचा मार्ग शेतकऱ्यांसाठी प्रशस्त होऊन कोविडकाळात राजधानी दिल्लीला सलग ३८० दिवस वेढणाऱ्या आंदोलक शेतकऱ्यांचा पुन्हा एकदा वेढा पडेल. त्यामुळे हमी भावाचा मुद्दा राष्ट्रीय राजकारणाच्या ऐरणीवर येऊन केंद्रातील मोदी सरकारच्या डोकेदुखीत आणखी भर पडेल. त्याच्याबरोबरीने जम्मू आणि काश्मीरमधील नवनिर्वाचित सरकारला केंद्राद्वारे नियंत्रित करण्याच्या प्रयत्नांचे तीव्र पडसाद उमटू शकतात. आठ ऑक्टोबरनंतर केंद्रापुढे ही संभाव्य आव्हाने निर्माण होण्याची चिन्हे आहेत. भारताचे शीर्ष असलेल्या लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि हरयाणा या प्रदेशांमध्ये सत्ता आणि नियंत्रण का निसटत आहे, याचा राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने केंद्रातील सरकारला नव्याने विचार करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

लोकसभा निवडणुकीत बहुमताने हुलकावणी दिल्यानंतरही या दोन्ही राज्यांमध्ये भाजपने नव्या मित्रपक्षांचा शोध न घेता परिस्थिती अनुकूल नसताना स्वबळावर लढण्यावर भर दिला आहे. दुसरीकडे काँग्रेसप्रणीत 'इंडिया'आघाडीतील विरोधी पक्ष एकत्र झाले आहेत. लोकसभा निवडणुकीप्रमाणेच या दोन्ही राज्यांमध्ये मतांचे विभाजन न होता भाजप आणि विरोधी आघाडीत सरळ लढती होतील, असा रागरंग आहे. हरियाना व जम्मू आणि काश्मीरच्या निकालांचा प्रभाव महाराष्ट्र आणि झारखंडच्या विधानसभा निवडणुकांवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.




तंत्रज्ञान आणि नवसंशोधनाने गेल्या दोन दशकांमध्ये 'मनासी टाकिले मागे, गतीशी तुळणा नसे' असा वेग धारण करीत अशक्यही शक्य करुन दाखविण्याची क्षमता वारंवार सिद्ध केली आहे. नवतंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत आणि त्याचा भरभरुन अवलंब करीत गेल्या दहा वर्षात भारताने जगात तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक शक्ती होण्यासाठी सिद्धता केली.

मागच्या शतकातील प्रस्थापित तंत्रज्ञान कालबाह्य करणाऱ्या नवसंशोधनाचा धाडसी अवलंब करताना त्यातून उद्‌भवणाऱ्या आव्हानांवर सहजपणे मात करीत वेगवान प्रगती साधणाऱ्या भारताने आपल्या सौम्य संपदेच्या जोरावर आज जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. कोविडच्या विश्वव्यापी संकटावर मात करण्याची क्षमता असो वा ईव्हीएमच्या माध्यमातून शंभर कोटी मतदान किंवा लाखो कोटींची उलाढाल करणाऱ्या 'यूपीआयची' चर्चा.

भारताची तंत्रज्ञानातील प्रगती जगाच्या नजरेत भरणारी ठरली आहे. मोबाईल क्रांतीची जोड लाभून शिक्षण, आरोग्य, वित्तीय सेवा, सार्वजनिक वाहतूक, वीज आणि पाणीपुरवठा यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्वसामान्यांचे जीवन सुसह्य झाले. वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात आमूलाग्र बदल करणाऱ्या नवसंशोधनाने एकाकीपण आणि म्हातारपण सुसह्य झाले. अनेक ठिकाणी रांगा मोडून घुसखोरी करणाऱ्यांना तंत्रज्ञानानेच शिस्त लावली. त्यामुळेच तंत्रज्ञान आपल्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनला आहे. हे मान्य केले तरी काही प्रश्नांची दखल घ्यावी लागेल.

सर्वसामान्यांपेक्षा सरस विचार करण्याची कुवत आणि कष्टकऱ्यापेक्षा जास्त काम करण्याची क्षमता यामुळे 'कृत्रिम प्रज्ञे'च्या वापरामुळे मनुष्याच्या कमाईच्या साधनांवरच गदा येण्याची शक्यता आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या सप्टेंबर महिन्यातील ताज्या अहवालाने निदर्शनास आणून दिले आहे. कृत्रिम प्रज्ञेच्या वाढत्या वापरामुळे कामगार-कर्मचाऱ्यांची उत्पन्नवाढ खुंटली असून जगभरातील तरुण वर्ग रोजगार, शिक्षण आणि प्रशिक्षणापासून दुरावला आहे. गेल्या दोन दशकांमध्ये तंत्रज्ञानातील नवसंशोधनाचा ३६ देशांवर प्रभाव पडून उत्पादनवाढ झाली असली तरी कामगार-कर्मचारी वर्गाचे उत्पन्न या कालखंडात २.४ ट्रिलियन डॉलरने वाढणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात करोनापश्चात २०२०-२२ या काळात ते ४० टक्क्यांनी घटल्याचा दावा या अहवालात करण्यात आला आहे. नवसंशोधनामुळे होणारी प्रगती साधक की बाधक हा प्रश्न त्यामुळे निर्माण झाला असला तरी जगातील अन्य देशांच्या तुलनेत लोकसंख्येत पहिल्या क्रमांकावर असलेल्या भारतापुढे या आव्हानाची तीव्रता अद्याप तरी जाणवलेली नाही.

वाढती बेरोजगारी, रुंदावणारी आर्थिक विषमता, बोकाळलेला भ्रष्टाचार, समाजात पडणारी फूट, वाढता हिंसाचार, दैनंदिन जीवन अस्तव्यस्त करणारे लहरी हवामान, महिलांविरुद्धची वाढती अमानुषता आणि युद्धखोरीला आळा घालण्यात कृत्रिम प्रज्ञा आणि तंत्रज्ञानाची प्रगती असमर्थ ठरली आहे. पण ते तंत्रज्ञानाचे नव्हे तर त्याला न जुमानणाऱ्या मानवी प्रवृत्तीचे उणेपण ठरले आहे. समाजहिताचे भान ठेवून विकसित होणारे नवसंशोधन वाईट नसते.

कृत्रिम प्रज्ञा कितीही सरस असली तरी त्याचा वापर कोणाच्या हाती आहे ते महत्त्वाचे ठरते. आज वापरात असलेल्या तंत्रज्ञानाबद्दल उत्तरदायित्व आणि विश्वासार्हतेचे प्रश्न त्यातूनच निर्माण झाले आहेत. ग्रहणशक्ती आणि बुद्धिमत्तेच्या बाबतीत सरस ठरुन यत्र, तत्र सर्वत्र वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम प्रज्ञेमुळे अनेक आघाड्यांवर निर्माण होणाऱ्या आव्हानांना आज ना उद्या भारताला सामोरे जावेच लागणार आहे. मोबाईलच्या माध्यमातून मन, बुद्धी चित्त आणि अहंच्या तरंगांचा ठाव घेत कृत्रिम प्रज्ञा मानवाचे तमो, रजो आणि सत्वगुण प्रभावित करु लागली आहे. वर्तमानातील समस्या आणि भविष्यातील संकटांचे विश्लेषण करण्याच्या बाबतीत 'कृत्रिम प्रज्ञा' मानवी मनापेक्षा काही बाबतीत उजवी ठरत आहे. त्यामुळे निर्णयक्षमता, उत्पादनक्षमता आणि कार्यक्षमता वाढणार असली तरी तिच्या आहारी जाणे धोकादायक ठरु लागले आहे. कृत्रिम प्रज्ञेच्या या त्सुनामीमध्ये प्रवाहपतीत न होता मानवी बुद्धीला चालना देऊन वैयक्तिक आणि सामूहिक प्रयत्नांद्वारे तिला तिची जागा दाखवून देण्याचे आव्हान मानवजातीपुढे निर्माण झाले आहे. 'जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ॥ भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ॥' या ओवीतून दुष्टजनांचे सत्कर्मांमध्ये स्वारस्य वाढून सर्व प्राणीमात्रांमध्ये मैत्रभाव निर्माण करण्याचा संत ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला सद्‌भाव समाजात रुजविणे, यात मानवी प्रज्ञेची कसोटी लागणार आहे.

त्यासाठी 'तंत्रज्ञान' उपयोगी पडेल; पण त्याहीपेक्षा 'तत्त्वज्ञान' कामास येईल. सामाजिक सौहार्दाचे हे शिवधनुष्य पेलण्यासाठी केवळ केंद्रातील आणि राज्यांतील सरकारांचा पुढाकार पुरेसा ठरणार नाही. त्यासाठी समाजातील सामूहिक इच्छाशक्ती जागृत करावी लागेल. कृत्रिम प्रज्ञा आणि तंत्रज्ञानाचा दुष्टबुद्धीने वापर करणाऱ्यांमुळे उद्भवणाऱ्या विघ्नांचे नियंत्रण ज्ञान-विज्ञानाचा, बुद्धीचा अधिष्ठाता असलेल्या गणेशाच्या प्रेरणेतूनच करावे लागणार आहे.

## तांब्याच्या भांड्यात गरम लिंबू पाणी प्यायल्याने विषबाधा होऊ शकते? तज्ज्ञांनी मांडले मत..!

तांब्याच्या भांड्यात साठवलेले पाणी प्यायल्याने किंवा लिंबू पाणी प्यायल्याने अनेक आजारांपासून लढण्याची शक्ती मिळते. या संदर्भातील माहिती सातत्याने सोशल मीडियावर चर्चेत असते. पोषणतज्ज्ञ ल्युक कॉउटिन्हो सांगतात, 'याच सवयी जेव्हा जास्त प्रमाणात दैनंदिन आयुष्यात आणल्या जातात तेव्हा त्याचा घातक परिणामही आरोग्यावर होऊ शकतो.' इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या एका पोस्टमध्ये त्यांनी एका प्रकरणाचा उल्लेख केला आहे; ज्यात त्यांनी लिहिलेय, 'अकिरा या १७ वर्षीय मुलीचे पोट अचानक एके दिवशी सकाळी दुखू लागले. या संदर्भात तिनं कौटिन्होकडे तक्रार केली. कौटिन्हो यांनी तिला तपासल्यावर लक्षात आलं की, तिच्या पोटात दुखायला सुरुवात होण्याआधी तिनं तांब्याच्या भांड्यातील पाणी गरम करून, तसेच त्यात लिंबाचा रस टाकून, ती ते पाणी प्यायली होती.' तिला असे करणे थांबवायला सांगितल्याबरोबर, तिला होणारा त्रास हळूहळू कमी होऊ लागला.बऱ्याच वेलनेस ट्रेंडप्रमाणे, संयम महत्त्वाचा आहे आणि एकूणच आरोग्य राखण्यासाठी या पाण्याच्या वापराच्या लोकप्रिय पद्धतींचे संभाव्य तोटे समजून घेणेही गरजेचे आहे.



नीलांजना जे., अपोलो क्लिनिक, जे. पी. नगर येथील आहारतज्ज्ञांनी सांगितले, 'तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्यासाठी वापरल्यास अनेक फायदे होऊ शकतात; परंतु ते जास्त प्रमाणात प्यायल्यास विषबाधा होऊ शकते. तांब्याच्या भांड्यामधून दररोज एक किंवा दोन ग्लास अधिक प्यायल्याने तांब्यातील विषारीपणा, गॅस्ट्रोइंटेस्टायनल त्रास, यकृत खराब होणे व न्यूरोलॉजिकल यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.'

हंग्री कोआला येथील वरिष्ठ पोषणतज्ज्ञ इप्सिता चक्रवर्ती या गोष्टीला सहमती देत म्हणाल्या, 'जागतिक आरोग्य संघटनेने (ऐंघ) तांब्याच्या भांड्यातील प्रतिलिटर पाण्यातील जास्तीत जास्त दोन मिलिग्रॅम पाणी पिण्याची शिफारस केली आहे.' नीलांजना यांच्या मते, या गरम केलेले पाणी किंवा लिंबू मिसळलेले पाणी तांब्याच्या भांड्यातून पिण्यास नकार देतात. 'गरम पाणी किंवा लिंबाचा रस घातलेले पाणी तांब्याच्या भांड्यात ओतल्यास ही बाब रासायनिक अभिक्रियांना जन्म देऊ शकते. कारण- तांब्याचे गुणधर्म अम्लीय पदार्थांद्वारे (लिंबासारखे) बदलू शकतात किंवा उष्णतेमुळे अशा प्रकारे तांबे धातूपासून जे क्षार तयार होतात, ते शरीरासाठी मोठ्या प्रमाणात हानिकारक असतात.' नीलंजना यांच्या मते, 'जर तांब्याच्या भांड्यात गरम पाणी किंवा लिंबाचा रस घातला, तर तांबे धातूमुळे ॲसिटेट आणि कॉपर कार्बोनेट यांसारखी विषारी संयुगे तयार होऊ शकतात.' त्याच्या सेवनामुळे इतर आरोग्यविषयक समस्या गंभीर गॅस्ट्रोइंटेस्टायनल गडबड होऊ शकते.

नीलांजना सांगतात, 'गर्भवती महिलांनी काळजी घ्यायला हवी की, तांब्याच्या भांड्यातील जास्त पाणी पिणे गर्भातील बाळाच्या वाढीवर परिणाम करू शकते.'

त्या म्हणतात की, बाळावर तांब्याच्या विषबाधेचा जास्त परिणाम होतो. कारण- त्यांचे शरीर लहान आकाराचे असते आणि त्यांच्या शरीराची हळूहळू वाढ होत असते. यकृताच्या रुग्णांनीही तांब्यातील पाण्याचे सेवन मर्यादित केले पाहिजे. कारण- त्यांचे यकृत तांबे डिटॉक्सिफाय आणि उत्सर्जित करण्यात कार्यक्षमतेने कार्य करू शकत नाही.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

| | |
|---|---|
| Email :- centralmumbai.ee@mahapwd.com | ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२ |
| जा.क्र.का.अ./मयुंवि/ई-निविदा/ ५०७८ | दिनांक :- २८/०८/२०२४ |

**ई निविदा सूचना क्रमांक ३० सन (२०२३-२४) (व्दितीय वेळ)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | माझगाव न्यायिक वसाहतीमधील परिजात (तळमजला + १० मजले) इमारतीचे पाडकाम करणे. | ८६.५३ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दि.२९/०८/२०२४, सकाळी १५.०० पासून ते दि.०५/०९/२०२४ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दि.०६/०९/२०२४ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८) |

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.com 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ २५८०


Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ‘मिरवणुकीत गणवेशात नाचू नका, नाहीतर...’, मुंबई पोलीस आयुक्तांचे आदेश जारी; कारवाईचा इशारा!

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

मुंबई-पुण्यासह अवघ्या महाराष्ट्रात आज लाडक्या बाप्पांचं आगमन होत आहे. बाजारपेठांमधून मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. घरगुती बापांसह शेकडो मंडळांमध्येही गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभर ठिकठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सर्व गणेशभक्तांच्या सुरक्षेची जबाबदारी घेऊन पोलीस वर्ग रस्त्यावर खडा पाहारा देत आहे. या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी आता मुंबईत पोलीस आयुक्तांनी आदेश जारी केले आहेत. यानुसार, त्यांना पोलीस गणवेशात गणेश मिरवणुकीत किंवा इतर ठिकाणी नृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ६ सप्टेंबर रोजी सुरक्षाव्यवस्था व पोलीस दलाची उपलब्धता याचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. यावेळी मुंबईत पोलिसांनी गणेशोत्सवादरम्यान गणवेशावर नाचू नये, अशी सक्त ताकीद पोलीस आयुक्तांनी दिली आहे. यासंदर्भात एएनआयनं एक्सवर माहिती दिली आहे.

‘६ सप्टेंबर रोजी मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी बोलावलेल्या बैठकीमध्ये पोलिसांना गणेशोत्सवादरम्यान गणवेशात नृत्य करण्यास मनाई केली आहे. तसेच, असे करताना कोणता पोलीस अधिकारी वा



कर्मचारी आढळल्यास त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. पोलिसांनी त्यांच्या गणवेशाचा आदर राखला पाहिजे’, असं विवेक फणसाळकर या बैठकीत म्हणाल्याचं वृत्त मुंबई पोलिसांच्या हवाल्याने एएनआयनं दिलं आहे. गेल्या काही वर्षामध्ये काही पोलिसांचे गणवेशात नाचतानाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यामध्ये काही पोलीस अधिकाऱ्यांचाही समावेश होता. याचवर्षी फेब्रुवारी महिन्यात एका महिला पोलीस अधिकाऱ्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल झाला होता. मुघल-ए-आझम चित्रपटातील ‘किसी दिन मुस्कुरा कर ये नजारा हम भी देखेंगे’ या गाण्यावर सदर महिला अधिकारी नाचताना दिसत आहे. यावर अनेक युजर्सनं टीकात्मक पोस्टही केल्या होत्या.

– मुंबईतील १२ हजारांहून अधिक सार्वजनिक गणेश मूर्तींची, तर दोन लाख २४ हजारांहून अधिक घरगुती गणपतींची शनिवारी प्राणप्रतिष्ठा होत आहे.

- ठाणे जिल्ह्यात २ लाख ५५ हजार २३ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना.

- ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरात घरगुती १ लाख ६० हजार ४६४ तर सार्वजनिक १ हजार ४३ गणेशमूर्तीची प्रतिष्ठपना होणार आहे.

- नवी मुंबई शहरात सार्वजनिक ८८६ तर, घरगुती ९२,६३० इतक्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे.

# 'मेट्रो १'च्या सेवा कालावधीत ७ आणि १७ सप्टेंबर रोजी वाढ

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘घाटकोपर – अंधेरी – वर्सोवा मेट्रो १’ मार्गिकेच्या सेवा कालावधीत वाढ करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) घेतला आहे. या निर्णयानुसार ७ आणि १७ सप्टेंबर रोजी ‘मेट्रो १’च्या सेवेचा कालावधी ५० ते ५५ मिनिटांनी वाढविण्यात आला आहे. अतिरिक्त कालावधीत ‘मेट्रो १’वर मेट्रोच्या सहा अतिरिक्त फेऱ्या होणार आहेत. गणेशोत्सवादरम्यान वाढत्या प्रवाशांना सामावून घेण्यासाठी एमएमओपीएल ‘मेट्रो १’ मार्गिकेवरील सेवेचा कालावधी वाढविला आहे. त्यानुसार गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी अर्थात ७ सप्टेंबर आणि १७ सप्टेंबर रोजी रात्री उशिरापर्यंत ‘मेट्रो १’ची सेवा सुरू राहणार आहे. वर्सोवा – घाटकोपर मार्गिकेवर दररोज रात्री ११.२० वाजता बंद होणारी मेट्रो सेवा गणेश चतुर्थीला आणि अनंत चतुर्थीच्या दिवशी रात्री १२.१० वाजता बंद होणार आहे. तर घाटकोपर – वर्सोवा मार्गिकेवरील सेवा रात्री ११.४० ऐवजी ७ सप्टेंबर आणि १७ सप्टेंबर रोजी रात्री १२.४५ वाजता बंद होणार आहे. एकूणच ‘मेट्रो १’ मार्गिकेवरील सेवेचा कालावधी गणेश चतुर्थी आणि अनंत चतुर्थीच्या दिवशी रात्री ५० ते ५५ मिनिटांनी वाढविण्यात आला आहे.




# विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी ‘महा वाचन उत्सव’, शालेय शिक्षण विभागाचा उपक्रम

■ **मुंबई : सम्यक कासारे**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शालेय शिक्षण विभागाने ‘महा वाचन उत्सव’ उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना रोज किमान १० मिनिटे वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. या उपक्रमांमध्ये राज्यातील १ कोटी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात येणार असून, अवघ्या काही दिवसांमध्ये या उपक्रमासाठी नऊ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

वाचन संस्कृती हळूहळू लोप पावत चालली आहे. विद्यार्थ्यांचा पुस्तके, वर्तमानपत्रे, साहित्य, आत्मचरित्र, काव्य वाचन करण्याकडे कल कमी होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळत नाही. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (एमपीएसपी) राज्यातील इयत्ता तिसरी ते



१२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘महा वाचन उत्सव’ उपक्रम हाती घेतला आहे. १६ ऑगस्ट ते २० सप्टेंबरदरम्यान हा उपक्रम राज्यातील सर्व शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी दररोज १० मिनिटे अवांतर वाचन करावे, त्यानंतर त्याचे आकलन करून न बघता ते कागदावर लिहून काढावे. यामुळे विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहन मिळेल, तसेच त्यांची आकलन क्षमता वाढीस मदत होणार आहे. या उपक्रमातून राज्यभरातून तीन विद्यार्थ्यांची विजेता म्हणून निवड करण्यात येणार असल्याचो माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या (एमपीएसपी) प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिली. राज्यातील १ लाख ८ हजार २५८ शाळांपैकी ९५ हजार १४४ शाळांनी या उपक्रमासाठी नोंदणी केली आहे. या शाळांमधील १ कोटी ७३ लाख ४६ हजार ४१ विद्यार्थ्यांपैकी ९ लाख २० हजार ५१६ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे. यामध्ये मुंबई व मुंबई उपनगर दोन्ही जिल्हे मिळून ९६ हजार ९७ इतक्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्याखालोखाल ठाणे जिल्ह्यातून ७२ हजार ८३६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. शिक्षणाची पंढरी समजल्या जाणाऱ्या पुण्यातून या उपक्रमाला फारच कमी प्रतिसाद मिळाला असून पुण्यातील १६ लाख ७९ हजार विद्यार्थ्यांपैकी अवघ्या ६० हजार ६१५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. अहमदनगर ५३ हजार ५८१, छत्रपती संभाजी नगर ४८ हजार ४६९, पालघर ४६ हजार ३३५ आणि कोल्हापूर ४० हजार ४१० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

# पाच हजार नवीन एसटी बसगाड्या एसटीच्या ताफ्यात दाखल होणार, १३१० खासगी एसटी बससाठी निविदा प्रक्रिया सुरू

■ **मुंबई : गणेश बागडे**

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भाडेतत्त्वावरील नवीन १३१० खासगी बसगाड्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई आणि पुणे विभागासाठी ४५०, छत्रपती संभाजी नगर आणि नाशिक विभागासाठी ४३०, तर अमरावती व नागपूर विभागासाठी ४६० नवीन बसगाड्या भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

यापूर्वी महामंडळाने सुमारे ३५० बस भाडेतत्त्वावर घेतल्या होत्या. त्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे भविष्यात साध्या बसची कमतरता भरून काढण्यासाठी भाडेतत्त्वावर आणखी काही बस घेण्याचा प्रस्ताव महामंडळाच्या विचाराधीन होता. शिवनेरी आणि शिवशाही या आरामदायी बससाठी भाडेतत्त्वावरील बस घेण्याचा प्रयोग यापूर्वी एसटी महामंडाने केला आहे. अशाच पद्धतीने खासगी संस्थेचा चालक, डिझेल आणि बसची तांत्रिक देखभाल करणे या




अटीवर पुढील सात वर्षांसाठी या बसगाड्या घेण्यात येणार असून संबंधित खासगी संस्थेला प्रति / किलोमीटरप्रमाणे एसटी महामंडळ भाडे अदा करणार आहे. यापूर्वीच महामंडळ स्तरावर शासनाच्या निधीतून २२०० बसगाड्या घेण्यास सुरुवात झाली आहे. त्यापैकी पहिल्या ३०० बस नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला येण्याची शक्यता आहे.

# ‘बॉम्बेचं मुंबई करण्यात तुमचं योगदान असेल, तर...’; ‘त्या’ विधानावरून संजय राऊतांचा अमित शाह यांच्यावर हल्लाबोल!

■ **मुंबई : गणेश बागडे**

दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर असलेल्या गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी एका वृत्तपत्राच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी बोलताना, त्यांनी, बॉम्बे नको मुंबई हवी, अशी मागणी झाली, तेव्हा मीदेखील ही मागणी करणाऱ्यांमध्ये होतो, असं विधान केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यावरून आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही भाष्य केलं आहे.

संजय राऊत यांनी आज मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्यावर जोरदार टीका केली. तसेच त्यांनी अमित शाह यांच्या वरील विधानाचाही समाचार घेतला, बॉम्बेचं मुंबई करण्यात अमित शाहांचं योगदान असेल, तर आम्ही काय त्यावेळी



गोट्या खेळत होतो का? अशी प्रतिक्रिया संजय राऊत यांनी दिली. ‘बॉम्बेचं मुंबईत करण्यात माझं योगदान आहे, असं अमित शाह म्हणत असतील, तर मग आम्ही काय त्यावेळी गोट्या खेळत होतो का? बॉम्बेचं मुंबई व्हावं, मुंबईतील दुकानांवरील पाट्या मराठीत व्हाव्या, यासाठी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात आम्ही मोठं आंदोलन केलं होतं. राम नाईक, पीबी सांमत यासारख्या नेत्यांनी हा विषय न्यायालयात नेला होता. त्यावेळी लढ्यात सर्वच पक्षाचे नेते सहभागी झाले होते. मात्र, तुम्ही मुंबईला येता आणि बॉम्बेचं मुंबई मी केलं म्हणून सांगता आणि यावरून भाजपाचे लोक मुर्खासारखे टाळ्या वाजवतात, हे सगळंच हास्यास्पद आहे’, अशी टीका संजय राऊत यांनी केली. ‘१०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून ही मुंबईत निर्माण झाली आहे. हे हुतात्मे मराठीत होते.

# चार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

■ **मुंबई : यश सावंत**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, प्रोस्थेटिक ॲण्ड ऑर्थो आणि स्पीच ॲण्ड लॅंग्वेज पॅथोलॉजी या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर कले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना ९ सप्टेंबर रोजी उपलब्ध जागांची माहिती मिळणार असून, १२ सप्टेंबर रोजी पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमापाठोपाठ सीईटी कक्षाने आयुर्वेद, होमियोपॅथी व युनानी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली आहे. त्याचबरोबर आता फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, प्रोस्थेटिक ॲण्ड ऑर्थो आणि स्पीच ॲण्ड लॅंग्वेज पॅथोलॉजी या



पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचेही वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांसाठी राज्यस्तरावर उपलब्ध असलेल्या जागांचा तपशील सीईटी कक्षाकडून संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा पंसतीक्रम भरण्याची सुविधा उपलब्ध केली जाणार आहे.

# विधानसभेसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान? अशोक चव्हाण यांचा अंदाज

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. परंतु, पुढील महिन्यात म्हणजे ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता लागू होऊन नोव्हेंबरमध्ये मतदान होईल, असा अंदाज व्यक्त केला जात असल्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी सांगितले. आमदार बबनराव लोणीकर यांनी कार्यकर्त्यांच्या भाजप पक्ष प्रवेशानिमित्त परतूर येथे आयोजित कार्यक्रमासाठी ते जालना जिल्ह्यात रविवारी आले होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना चव्हाण म्हणाले, या वेळेस भाजप आणि महायुतीमधील पक्षांना पूर्वीपेक्षा अधिक जागा मिळतील. मनोज जरांगे पाटील यांच्याशी आमचा समन्वय सुरू आहे. काही गैरसमज दूर झाले असून काही दूर होतील.




काही प्रश्न शिल्लक आहेत. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, कुणाचे आरक्षण काढून घेणे सोपे नाही. या विषयावर कुठेही वाद होऊ नये, याची काळजी घ्यावी लागते. मराठा समाजास दहा टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या त्यांना तशी प्रमाणपत्रे देण्यात येत आहेत. जे उर्वरीत प्रश्न बाकी आहेत, त्याबाबत नक्की पाठपुरावा करण्यात येत आहे. चर्चेतून आणि समन्वयातून मार्ग काढण्याचे प्रयत्न आहेत. शरद पवार यांच्या डोक्यात काय चालले आहे, हे देवेंद्र फडणवीस यांना शंभर जन्म घेतले तरी कळणार नाही, असे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले होते. या वक्तव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना चव्हाण म्हणाले, शरद पवार यांच्या डोक्यात काय चालले आहे याच्याशी आम्हाला काय करायचे ? आम्हाला आमच्या डोक्याने काम करायचे आहे.

# मालाड दुर्घटनाप्रकरणी पाच जणांना अटक

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

मालाड येथील बहुमजली इमारतीच्या २० व्या मजल्याच्या छताचा काही भाग कोसळून तीन कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी दिंडोशी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. त्यात कंत्राटदार, दोन अभियंते




व दोन पर्यवेक्षकांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले आहेत.

मालाड येथील हाजी बापू मार्गावरील गोविंद नगरमधील नवजीवन या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत (झोपु) बहुमजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास अचानक २० व्या मजल्याच्या छताचा काही भाग कोसळला. बांधकामस्थळी काम करणारे काही कामगार मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले. दुर्घटनेत जखमी झालेल्या सहा जणांना मातीच्या ढिगाऱ्याखालून बाहेर काढून नजिकच्या एम. डब्ल्यू देसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी तिघांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याप्रकरणी कैलाश भारुडे (४२), प्रणय पडवळकर (३३), सागर सोनू (३६), सागर रेवरे (३२), आणि मनप्रीत सिंह (४०) यांना पोलिसांनी अटक केली. सिंह हे बांधकाम ठिकाणाचे कंत्राटदार आहेत. इतर दोघे अभियंते आहेत. आरोपींना शुक्रवारी न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना शनिवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# ईडीच्या तक्रारीवरून ‘रेलिगेअर’च्या कार्यकारी अध्यक्षांसह चौघांविरोधात गुन्हा, बर्मन कुटुंबाविरोधात खोटी माहिती दिल्याचा आरोप

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) रेलिगेअर एन्टरप्रायझेस प्रा. लि., दिल्लीच्या कार्यकारी अध्यक्ष डॉ. रश्मी सलुजा यांच्यासह तिघांविरोधात मुंबई पोलिसांकडे तक्रार केली असून त्याअंतर्गत शुक्रवारी माटुंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ईडीचा बर्मन




कुटुंबीयांबाबत चुकीची माहिती देणे व त्याआधारे १७९ कोटी रुपयांचा बेकायदेशीर फायदा घेतल्याचा आरोप केला आहे. कंपनीचे सीएफओ नितीन अग्रवाल व अध्यक्ष निशांत सिंगल यांच्याविरोधात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी माटुंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तो पुढील तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. ईडीचे साहाय्यक संचालक राम नारायण यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, ईडी मलविंदर मोहन सिंह आणि इतरांविरुद्ध प्रकरणाचा तपास करत होते. हे प्रकरण कोर्टाच्या आदेशाने दाखल केलेले फौजदारी प्रकरण (एमईसीआर) असून त्यानुसार ११ नोव्हेंबर २०२३ रोजी माटुंगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हे प्रकरण वैभव जालिंदर गवळी (रिलिगेअर एंटरप्रायझेस लि. चे शेअर होल्डर) यांनी दाखल केले होते. त्यात त्यांनी माजी संचालक मलविंदर मोहन सिंह आणि शिविंदर मोहन सिंह यांच्यावर बर्मन कुटुंबाच्या सहकार्याने रेलिगेअर एंटरप्रायझेस लि. च्या मालमत्तांचा अपहार केल्याचा आरोप केला होता. तपासादरम्यान, ईडीने गवळी यांना आर्थिक अनियमितता आणि बर्मन कुटुंबाचा त्यात सहभाग होता.

नव्या गुन्ह्यातील तक्रारीनुसार, सलुजा व इतर अधिकाऱ्यांनी एम्प्लॉई स्टॉक ओव्हनरशिप प्लानद्वारे निधी वळवण्यात आला. त्याद्वारे एकूण १७९ कोटी ५४ लाख रुपयांचा बेकायदेशीर फायदा घेण्यात आला. याप्रकरणी ईडीने २१ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्ली आणि गुरुग्राम येथील चार ठिकाणी छापे मारले होते. या नवीन गुन्ह्याप्रकरणी मुंबई पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा अधिक तपास करत आहे.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग,

राज्य कामगार विमा योजना रूग्णालय आवार, लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुलुंड (प), मुंबई-४०००८०

ई-मेल पत्ता :- elnorthmumbai.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक :-०२२-२५६०१३२७

ई-निविदा सुचना क्र. २६ /२०२४-२५

कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई हे महाराष्ट्र शासनाकडील विद्युत ठेकेदार (लिफाफा क्र.१ अनुसार) यांचे कडून खालील कामाकरिता ब-१ टक्के वारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलुंड, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नांव : | निविदा रक्कम रूपये : |
|---|---|
| १. अंदाजपत्रक क्र.अटळ/ एनएमईडी/एमएसएसडी/ओएमएस/२४०५५/२०२४-२५, जुने महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, जनित्र (५०० के व्ही ए), उद्वाहन, विद्युत उपकेंद्र(५०० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविण्याकरीता ( मागणी दुसरी) | रूपये २७२७००० /- |
| २. अंदाजपत्रक क्र.अटळ/ एनएमईडी/एमएसएसडी/एनएमएस/२४००९/२०२४-२५,नविन महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथील वातानुकूलित यंत्रणा, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (१८० केलडी), जनित्र (२००० के व्ही ए), उद्वाहन, विद्युत उपकेंद्र(२००० के व्ही ए) चालविण्याकरीता आणि दैनंदिन देखभालीसाठी कुशल चालक व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने पुरविण्याकरीता ( मागणी दुसरी) | रूपये ४१२९९२०/- |
| ३. अंदाजपत्रक क्र .अटळ/एनएमईडी/बीईएसडी/बीएनडी/२४१३०/२०२४-२५,भास्कर कोर्ट बिल्डींग, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१ येथील तळमजला + ८ व्या मजल्यावरील ओटीस इलेव्हेटर कंपनीच्या २ लिफ्टस् यांना त्रैवार्षिक सर्वकष देखभाल दुरुस्ती करणे बाबत. | रूपये १३०८६६० /- |
| ४. अंदाजपत्रक क्र. अटळ/एनएमईडी/बीईएसडी/बीकेसी/२४३२८/२०२४-२५, शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) मुंबई येथील उपविभागांतर्गत बीकेसी शाखेतील विद्युतीकरणाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी तात्पुरते स्वरुपात ठेकेदार पध्दतीने 6 महिने कालावधीकरीता वायरमन व मजदूर उपलब्ध करुन देणे बाबत | रूपये १४५०८०० /- |
| ५. अंदाजपत्रक क्र. एसआर/एनएमईडी/बीईएसडी/बीसीएन/२४२२१/२०२४-२५,प्रशासकीय ईमारत वांद्रा (पूर्व) येथील तिसऱ्या माळयावरील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगर व अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई उपनगर यांच्या कार्यालयातील स्थापत्य विभागामार्फत प्रस्तावित केलेल्या नुतनीकरणाच्या कामामुळे विस्कळीत झालेल्या विद्युतीसंच मांडणीचे नुतनीकरण करणे बाबत. | रूपये ३४२६५८०/- |
| ६. . अंदाजपत्रक क्र .अटळ/एनएमईडी/बीईएसडी/बीसीएन/लेबर/२४२२७/२०२४-२५,शासकीय वसाहत वांद्रे (पूर्व) मुंबई येथील उपविभागांतर्गत वांद्रे शाखेतील विद्युतीकरणाच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी 6 महिने कालावधी करीता तात्पुरते स्वरुपात ठेकेदार पध्दतीने वायरमन व मजदूर सेवा पुरविणे बाबत. | रूपये १३२२५६८/- |
| ७ अंदाजपत्रक क्र.अटळ/एनएमडी/बीईएसडी/बीसीएन/२४२२९/२०२४-२५, प्रशासकीय इमारत वांद्रे पूर्व, मुंबई येथे तळमजला तसेच १० व्या मजल्यासाठी प्रवाशांकरिता स्थापित केलेल्या २ स्वयंचलित सेंट्रल दरवाजे ओपनिंगसह इलेक्ट्रिक पॅसेंजर लिफ्टसाठी सर्वकष वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे बाबत | रूपये १२१६३४४/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.०४.०९.२०२४ ते दि.१२.०९.२०२४ रोजी १७.३० वा.पर्यत.

ई निविदा उघडणे : दि.१७.०९.२०२४ रोजी १४.०० वा.नंतर.

(सार्वजनिक बांधकाम विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २२/प्र.क्र १०४/इमा-२ मंत्रालय ,मुंबई दि.२८.०६.२०२४)

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.

१.वरील अंदाजित रक्कमेत जी.एस.टी. सामाविष्ट नसून ठेकेदाराने निविदेत दर भरताना जी.एस.टी.वगळून दर नमूद करावा.अंदाजित रक्कमेवर नमूद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी.१८% वेगळा अदा करण्यात येईल.

२. http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)

३. कामाच्या करारनाम्यात पोस्ट क्वॉलिफी केशनचा क्रायटेरिया समाविष्ट केलेला आहे.

४. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विद्युत विभाग, मुलूंड (प), मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.काअ/उमुंविवि/निविदा/ २४३८ /२०२४ दिनांक: २८.०८.२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ २६१९

सही
कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई विद्युत विभाग,
सा.बां.विभाग, मुंबई.

# बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर शालेय मुलांच्या सुरक्षेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय समिती

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

बदलापूर येथील लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला. त्याची दखल घेऊन शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेच्या चौकशीसाठी आणि सुरक्षिततेचे उपाय सुचवण्यासाठी उच्च न्यायालयाने सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. तसेच, २९ ऑक्टोबरपर्यंत समितीने सुरक्षिततेच्या उपायांची शिफारस करणारा अहवाल सादर करावा, असे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

मुले शाळेत असताना तसेच ती शाळेतून ये-जा करत असताना त्यांच्यासह अशा घटना घडू नयेत यासाठी सुरक्षिततेचे उपाय सुचवण्यासाठी न्यायमूर्ती रेवती मोहिते - डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने ही सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. विशेष म्हणजे, बदलापूर येथील घटनेनंतर राज्य सरकारने या मुद्यासाठी समिती स्थापन केली होती. न्यायालयाने या समितीचा विस्तार केला. शहरी आणि ग्रामीण भागांतील शाळांना भेडसावणाऱ्या समस्या वेगळ्या आहेत. त्या विचारात घेऊन न्यायालयाने या समितीची व्याप्ती वाढवली व त्यात शहरी व ग्रामीण भागांतील शाळांच्या मुख्याध्यापिकांचा समावेश केला.

न्यायालयाने स्थापन केलेली समिती उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव आणि न्यायमूर्ती शालिनी फणसळकर - जोशी यांच्या नेतृत्वाखाली



काम करणार आहे. याशिवाय, या समितीमध्ये निवृत्त आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांच्यासह इंडियन एज्युकेशन सोसायटी संचालित दादर येथील व्ही. एन. सुळे शाळेच्या मुख्याध्यापिका सुचेता भवाळकर, कळंबोळी येथील सुधागड संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या हिंदी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयवंती सावंत, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हरीश शेट्टी तसेच महाराष्ट्र आणि गोवा येथील आयसीएसई व आयएससी पूर्व प्राथमिक शाळेचे अध्यक्ष ब्रायन सॅमोर यांचा समावेश असणार आहे. बदलापूर घटनेनंतर सरकारने स्थापन केलेल्या समितीने केलेल्या अंतरिम सूचना आणि शिफारशीही खंडपीठाने विचारात घेतल्या. तसेच, समितीतर्फे अंतिम अहवाल दिला जाईपर्यंत सरकार या सूचना किंवा शिफारशींची अंमलबजावणी करेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

शाळेत किवा त्या परिसरात असताना, तसेच शाळेच्या बसमधून प्रवास करताना मुलांच्या सुरक्षिततेबाबत सरकारने वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे आणि परिपत्रकांचे पुनरावलोकन करणे. शाळा आणि त्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी काय उपाययोजना करता येतील. बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) आणि तत्सम कायद्यांच्या प्रभावी अंमलजावणीसाठी शिफारशी सुचवणे. पूर्वप्राथमिक किंवा बालवाडीतील मुलांची सुरक्षा आणि त्याच्याशी संबंधित उपाय सुचवणे.

# डॉक्टर नसताना कर्मचाऱ्याकडून रुग्णावर उपचार, वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथील बोगस डॉक्टरवर पालिकेची कारवाई

■ **वसई : राकेश गायकवाड**

वसई विरार शहरात पुन्हा एकदा बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. नुकताच पालिकेच्या वैद्यकीय विभागाने वसई पूर्वेच्या भोयदापाडा येथील बेकायदेशीरपणे दवाखाना चालविणाऱ्या बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. यावेळी डॉक्टर नसताना कर्मचाऱ्याकडून रुग्णांवर उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे.

वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विविध ठिकाणी वाढते अनधिकृत बांधकामे व बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागात बोगस डॉक्टर दवाखाने




थाटू लागले आहेत. नुकताच सातीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय आरोग्य पथक तपासणीसाठी फिरत असताना

वसई पूर्वेच्या भोयदापाडा राजावळी रस्त्यावर बालाजी क्लिनिक या नावाने कोणतीही परवानगी न घेता बोगस डॉक्टरद्वारे दवाखाना चालविला जात असल्याची माहिती मिळाली होती. शुक्रवारी दुपारी डॉ. श्रीनिवासराव धुधमल आणि पथक व पोलीस यांना सोबत घेऊन धाड टाकली. त्यावेळी डॉक्टर नसतानाही कामासाठी ठेवलेल्या कर्मचाऱ्यांकडून रुग्णाला इंजेक्शन देऊन उपचार केले जात असल्याचे उघड झाले आहे. रामचंद्र रामदूर यादव असे या कर्मचाऱ्याचे नाव असून कोणतीही वैद्यकीय डिग्री नसल्याचे निष्पन्न झाले आहे. दवाखान्याला डॉ. आरविंद कुमार यादव यांचा फलक लावून त्या ठिकाणी कर्मचारी रुग्णांना सेवा देत होता अशी माहिती पालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिली आहे.

# वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात मद्यपींचा हैदोस

■ **वसई : सुचिता देशमुख**

वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात मद्यपींचा हैदोस वाढू लागला आहे. गुरुवारी सायंकाळी या किल्ल्यात चार जणांचा गट मद्यपान करताना आढळून आला त्यांच्या विरोधात वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पश्चिमेच्या भागात वसईचा ऐतिहासिक किल्ला आहे. किल्ल्याला विविध ठिकाणचे पर्यटक दुर्गप्रेमी भेट देत आहेत. किल्ल्याचे पावित्र्य राखले व त्यांचे संवर्धन व्हावे यासाठी दुर्गप्रेमी झटत आहेत. सध्या या किल्ल्यात विविध प्रकारचे विघातक प्रकार समोर येऊ लागले आहेत. गुरुवारी संध्याकाळी सहा वाजता वसई किल्ल्यातील नागेश्वर मंदिराजवळच्या बालेकिल्ला येथे काही मद्यपी मद्यपान करीत असल्याची माहिती वसईतील (ठाकरे गट) शिवसैनिकांना प्राप्त झाली. त्याची खातरजमा करण्यासाठी कोर्ट नाका विभाग प्रमुख दत्ता जाधव, उमेळा विभाग प्रमुख राकेश कदम यांनी त्याठिकाणी भेट दिली. पुरातत्व विभागाच्या कार्यालयासमोर ऐतिहासिक किल्ल्याच्या वरच्या बाजूस चार ते पाच जणांचा गट त्याठिकाणी मद्यपान करण्यास बसल्याचे निदर्शनास आले आहे. या चारही जणांची मद्यपान करतानाची चित्रफीत काढून त्यांना वसई पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले होते. याप्रकरणी वसई पोलिसांनी विक्रम पांडे,



अशोक पासवान, अरविंद गुप्ता, नंदलाल यादव या चार जणांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये कलम ८५(१)व प्राचीन स्मारके आणि पुरातन जागा व अवशेष याबाबत अधिनियम, १९५८ कलम ३० (१) नुसार गुन्हा दाखल केला असल्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक रणजित आंधळे यांनी सांगितले आहे. या घडलेल्या प्रकाराची चित्रफीत आता समाजमाध्यमातून प्रसारित होत असल्याने दुर्गप्रेमीकडून संताप व्यक्त केला जात आहे.

वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात चित्रीकरण करणे, गैरकृत्य, मद्यपान करणे, रील तयार करणे असे एकापाठोपाठ एक विघातक प्रकार समोर येऊ लागले आहेत.

# वसई विरार शहरात वाहने झाली उदंड, वाहतूक कोंडीच्या समस्येत भर; वर्षभरात ८४ हजार वाहने रस्त्यावर

■ **वसई : आकाश कांबळे**

वसई विरार मध्ये नवीन वाहने खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. वर्षभरात शहरात ८४ हजार ३८५नवीन वाहने दाखल झाली आहेत. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहतूक कोंडीत अधिकच भर पडू लागली आहे. दिवसाला सरासरी सव्वा दोनशेहून अधिक वाहने दाखल होत आहेत. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली आहे. मुंबईसह इतर ठिकाणचे नागरिकही आता वसई विरार मध्ये घरे घेऊन राहण्यास आले आहेत. त्यामुळे लोकसंख्ये सोबतच वाहनांची गर्दी ही प्रचंड प्रमाणात वाढू लागली आहे. सुरवातीला सणांचे



औचित्य साधून वाहने खरेदी केली जात होती. मात्र दुचाकी, चारचाकी ही वाहने सध्या एकप्रकारे नागरिकांची गरज बनू लागली आहे. त्यामुळे इतर दिवशीही वाहने खरेदी करण्याचे प्रमाण वाढले आहे. यंदाच्या वर्षात शहरात ८४ हजार ३८५ इतकी वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालयात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत शहरात ७ लाख ३७ हजार इतकी वाहने आहेत. मागील दोन वर्षांपासून वाहनांच्या संख्येत ३० ते ४० टक्क्यांनी वाढ होत आहे असे प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. शहरात वाहनांची संख्या १५ लाखांच्या घरात जाण्याची शक्यता परिवहन विभागाने वर्तवली आहे. परंतु वाढत्या वाहनांच्या संख्येनुसार वाहतूक नियोजन होत नाही तर दुसरीकडे अरुंद रस्ते, वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नाही त्यामुळे मुख्य रस्त्याच्या ठिकाणी वाहने उभी करावी लागत आहेत.अशा विविध प्रकारच्या अडचणीमुळे वाहतूक कोंडीची समस्या अधिकच जटिल बनली आहे.

इंधनाच्या वाढत्या किंमतीमुळे इलेक्ट्रिक वाहने घेण्याकडे नागरिकांचा कल अधिकच वाढला आहे. यंदाच्या चालू वर्षात ५ हजार ४२४ इतकी विद्युत वाहने दाखल झाली आहेत. यात सर्वाधिक दुचाकीं व चारचाकी वाहनांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.
निविदा सूचना क्रमांक ०४ सन २०२४ -२०२५

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५. (दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७) हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत वर्ग-७ व वरील वर्गाचे कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब - १ (ऑफलाईन) निविदा प्रणालीद्वारे देकार मागवित आहेत. कार्यकारी अभियंता, सा. बां. विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगांव (पुर्व) मुंबई-४०००६५ हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्रं | कामाचे नांव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र ३,९,१०,११ येथे विद्यमान पाणी पुरवठयातील C.I पाइपचे वार्षिक देखभाल काम करणे. | ७८२२५८.०० |
| २. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र १३,१४,१५,१६ येथे विद्यमान पाणी पुरवठयातील C.I पाइपचे वार्षिक देखभाल काम करणे | ७८०१८८.०० |
| ३. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र १७,१८,१९,२० येथे विद्यमान पाणी पुरवठयातील C.I पाइपचे वार्षिक देखभाल काम करणे. (सहा महिने साठी ) | ७८०६६३.०० |
| ४. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र १,२,४,५.६,७, येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ५९७२४०.०० |
| ५. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र ८, २१,२२,२५ येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ५९७२४०.०० |
| ६. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र १९,२०,२६,२९ येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ७७६४१२.०० |
| ७. | मूळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र ३०,३१,३२ येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ७८०४२०.०० |
| ८. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र ३,९,१०,११,१३,१४ येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ७८०४२०.०० |
| ९. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट क्र १५,१६,१७.१८,२८ येथे संबंधित पाण्याच्या कामांसाठी प्लंबर, कामगार आणि टेम्पो मागविणे. | ७८०४२०.०० |
| १०. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथे विद्यमान पाणी पुरवठ्यातील R.C.C पाइप लाइनचे ( पवई यार्ड ते पिकनिक पॉइंट लेक )वार्षिक देखभाल काम करणे.(सर्व प्रकारच्या R.C.C पाइप लाइनचे प्रदान व निराकरण करणे) | ५५१९११.०० |
| ११. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथे विद्यमान पाणी पुरवठ्यातील R.C.C पाइप लाइनचे ( यूनीट नंबर १५,१६,१७,१८,२० )वार्षिक देखभाल काम करणे.(सर्व प्रकारच्या R.C.C पाइप लाइनचे प्रदान व निराकरण करणे) | ७७८७२१.०० |
| १२. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील पिकनिक पॉइंट तलावाची दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७८३४२३.०० |
| १३. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट नंबर ७ (२ नंबर) येथील विद्यमान पंप रूमची दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७७५७३०.०० |
| १४. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट नंबर ७ येथील पाण्याची टाकी (संप) ची दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ४३८९४८.०० |
| १५. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील (मॉडर्न बेकरी , मुख्य पंप हाऊस, यूनिट नंबर १६ कोकण विकास, गोल टाकी, हिल क्वार्टर जुने व नवीन) पाण्याची टाकी (संप) स्वच्छ करणे. | ५०५४९०.०० |
| १६. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील (पिकनिक पॉइंट, आरे हॉस्पिटल, मॉडर्न बेकरी, यूनिट नंबर ५, ६, २९, ३०, ३१, ३२) पाण्याची टाकी (संप) स्वच्छ करणे. | ७४५९६१.०० |
| १७. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील गोल टाकी व आरे रुग्णालय जंक्शन येथे विद्यमान पंप हाऊसची दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७६६२९४.०० |
| १८. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील हिल टेकडी वसाहत ,यूनिट क्र १६ येथे विद्यमान पंप हाऊसचे दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७८३४०९.०० |
| १९. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील गोल टाकी येथे विद्यमान पाण्याच्या टाकीची (संप) दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७८२५४२.०० |
| २०. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील पिकनिक पॉइंट, आरे हॉस्पिटल, न्यूझीलॅंड हॉस्टेल येथे विद्यमान पाण्याच्या टाकीची दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | ७६३७३१.०० |
| २१. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील यूनिट नं- ५,६ येथे विद्यमान पंप हाऊसचे दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | २१३४९८.०० |
| २२. | मुळ गौण कामे अंतर्गत आरे मध्यवर्ती दुग्धशाळा परिसर, गोरेगाव (पू), मुंबई येथील विविध ठिकाणी चेंबर तयार करणे. | ६१८००६.०० |
| २३. | मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, गोरेगाव येथील पॉलिक्लिनिक इमारतीमधील क्ष-किरण खोलीचे नुतनीकरण करणे. | १३००६८.०० |

१. वरील अंदाजीत रक्कमेत जी.एस.टी.समाविष्ठ नसुन ठेकेदारांनी निविदेत दर भरताना जी.एस.टी.वगळून दर नमुद करावा. अंदाजीत रक्कमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी. १२ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यांत येईल.
२. निविदा उपलब्ध कालावधी दिनांक ०६/०९/२०२४ ते दिनांक १३/०९/२०२४ रोजी १७:३० पर्यंत.
३. निविदा स्विकारणे कालावधी दिनांक १८/०९/२०२४ रोजी दुपारी १२:००
४. निविदा उघडणे दिनांक १८/०९/२०२४ रोजी दुपारी १२:३० नंतर (सोईस्कर वेलेनुसार)

(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग. आरे. गोरेगाव. (पूर्व). मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्रं. सावांविप्र-आरे/नि.लि./ ९३८९
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक: 3/ ९/ 2024

कार्यकारी अभियंता
सा.बां.विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ २६९८

# गणेशोत्सवाच्या कालावधीत डोंबिवलीतील माणकोली पुलावरील वाहतूक बंद

■ **अंबरनाथ : सतिश सोनावणे**

डोंबिवलीतील गणपती बाप्पांचे विसर्जन माणकोली उड्डाण पुलाजवळील मोठागाव रेती मंदिर खाडी किनारी होणार आहे. या विसर्जन कालावधीत डोंबिवली पश्चिम येथील रस्त्यांवर वाहन कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक



विभागाने गणपती विसर्जन मिरवणुकांच्या दिवशी माणकोली उड्डाणपूल दुपारी १२ ते रात्री गणपती विसर्जन होईपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी या संदर्भाची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. माणकोली पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार असल्याने चालकांनी पर्यायी रस्त्याचा अवलंब करण्याचे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, सात दिवस आणि अनंत चतुर्थी या दिवशी सार्वजनिक आणि खाजगी गणपती बाप्पांचे विसर्जन होणार असल्याने. या कालावधीत दुपारी १२ ते गणपती विसर्जन होईपर्यंत माणकोली पूल वाहतुकीसाठी बंद असणार आहे.

मुंबई, ठाणे परिसरातून माणकोली पूल मार्गे डोंबिवली करणे येणाऱ्या वाहनांना अंजुर दिवेगाव, लोढा धाम, माणकोली गाव येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही वाहने अंजुरफाटा, रांजनोली, भिवंडी वळण रस्ता मार्गे इच्छित स्थळी जातील. शिळफाटा रस्ता, पत्रीपूल येथून पुरली ९० फुटी रस्ता, सोनारपाडा डीएनएस बॅंक, घरडा सर्कल, मानपाडा रस्ता, सुयोग हॉटेल, टाटा नाका, कोपर आणि ठाकुर्ली उड्डाणपूल या रस्ते मार्गाने माणकोली पुलाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रस्तावित ठिकाणी प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

# खासगी रुग्णालयांना दिलासा, महात्मा फुले जनआरोग्य योजनतील शस्त्रक्रियांच्या दरात वाढ

■ **पालघर : सचिन कदम**

सुधारित महात्मा फुले जनआरोग्य योजनेअतंर्गत असलेल्या रुग्णालयांना शस्त्रक्रियांच्या दरात १५ ते २० टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे रुग्णालयांना दिलासा मिळाला असून सर्वसामान्य रुग्णांवर अधिक चांगल्या पध्दतीने मोफत उपचार केले जाऊ शकणार आहे. सर्वसामान्य रुग्णांना गंभीर आजारावर मोफत उपचार देण्यासाठी राज्य शासनाकडून महात्मा फुले जनआरोग्य योजना राबवली जाते. या योजनेअंतर्गत १ हजार ३५६ आजारांवर दिड लाखांपर्यंत मोफत उपचार करण्यात येतात. १ हजारांहून अधिक खासगी रुग्णालयात ही योजना लागू करण्यात आली आहे.. १ जुलै २०२४ पासून संपूर्ण राज्यात सुधारीत महात्मा फुले जनआरोग्य योजना संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असून शिधापत्रिकेची अट काढण्यात आली आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना योजना खुली झाली असून ५ लाखांपर्यंतच्या उपचारांचा खर्च मोफत केला जात आहे. ज्या रुग्णालयात केंद्र शासनात आयुष्यमान भारत योजना लागू आहे तेथे ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंर्तगत रुग्णांना ५ लाखांचा उपचारांचा खर्च मोफत करण्यात येणार आहे. त्यातील साडेतीन लाख रुपयांचा भार राज्य शासन उचलणार आहे तर दीड लाखांचा खर्च विमा कंपनी करणार आहे. या योजनेअंतर्गत जी रुग्णालये येतात त्यांना जुन्या दरानुसार शस्त्रक्रियेचे दर राज्य शासनाकडून दिले जातात. त्यात वाढ करण्याची मागणी रुग्णमित्र सातत्याने करत होती. त्यामुळे नाईलाजाने रुग्णालये या योजनेअंतर्गत उपचार करण्यास टाळाटाळ करत होते. अनेक रुग्णालयांना खर्चाचा परतावा देखील शासनाकडून वेळेवर मिळत नव्हता. मात्र आता राज्य शासनाने रुग्णालयांना शस्त्रक्रियेच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या १ हजार ३५६ आजारांवर उपचार आणि शस्त्रक्रिया केली जाते. नव्या शासन निर्णयानुसार या शस्त्रक्रियांच्या दरात १० ते १५ टक्के वाढ करण्यात आली आहे.

# कारवाई होत नसल्याने भाजप कार्यकर्ते हवालदिल; केंद्रात, राज्यात सत्ता, मात्र वसईत कुणी दाद देईना

■ **वसई : सुचिता देशमुख**

भाजप कार्यकर्त्याला मारहाण करूनही त्यांच्यावर कठोर कारवाई होत नसल्याने वसईतील भाजप कार्यकर्ते हवालादिल झाले आहेत. मारहाण करणाऱ्याचे अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासाठी पालिका अधिकाऱ्यांच्या उंबरठे झिजवूनही काहीच फायदा झालेला नाही. केंद्रात आणि राज्यात सत्ता असतांनाही वसईत आम्ही काही करू शकत नाही, असे भाजप कार्यकर्ते हताशपणे बोलू लागले आहेत. भाजपचे कार्यकर्ते प्रतीक चौधरी यांच्यावर बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी स्वप्नील नर यांनी भर रस्त्यात आढळून



मारहाण केली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल केला तरी लगेचच जामिनावर सुटले. त्यामुळे स्वानिल नर यांच्या अनधिकृत टपऱ्यावर कारवाई करा म्हणून भाजपने पालिकेला पत्र दिले. परंतु कारवाई झाली नाही. गुरुवारी मग भाजपचे सर्व वरीष्ठ नेते पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना भेटले. जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, नालासोपारा विधानसभा संघटक मनोज पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मनोज बारोट माजी नगरसेवक किरण भोईर, ॲडव्होकेट राहुल सिंग अशा दिग्गज नेत्यांचा त्यात समावेश होता. मात्र आयुक्तांकडून ठोस आश्वासन न मिळाल्याने हे नेते निराश झाले होते. 'केंद्रामध्ये आणि राज्यांमध्ये आमची सत्ता आहेष्ठ आमचेच गृहमंत्री केंद्रात आणि राज्यात आहे तरी बहुजन विकास आघाडीच्या गुंडांकडून आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्याला मारहाण होते आणि आम्ही काहीच करू शकत नाही, आम्हाला कोणी विचारत नाही अशी खंत माजी नगरसेवक किरण भोईर यांनी व्यक्त केली.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमधून दोन वर्षांत ३२१ कोटींची आर्थिक मदत!

■ **मुंबई : गणेश बागडे**

**मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या माध्यातून गेल्या २ वर्षं २ महिन्यात ३२१ कोटींहून अधिक अर्थसहाय्य वितरित करुन तब्बल ४० हजारांहून अधिक गंभीर रुग्णांना वाचविण्याचा विक्रम केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरगरीब - गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे.**

मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये, या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कक्षाचे काम सुरु आहे. याचाच परिणाम म्हणून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष मंत्रालय, मुंबई कार्यालयामधून तब्बल २९२ कोटींपेक्षा अधिक तर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष नागपूर कार्यालयमधून २८ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधून रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहे. याबाबत जनजागृती करुन जास्तीत जास्त रुग्णालये या योजनेत जोडण्यात येत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड ॲम्बेसडरपदी अवघ्या एक वर्षाच्या दुवा नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकुबाई आणि सादिक मकूबाई या मुस्लिम दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या १३ दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते.



एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर तात्काळ जुलै महिन्यात 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मदत निधी योजने'ला गती देण्याचे आदेश जारी केले होते. तसेच यापूर्वी अनेक खर्चिक व गंभीर आजारांचा या योजनेत समावेश नव्हता, तो आता नव्याने करण्यात आला आहे. यात फुफ्फुसाची शस्त्रक्रिया, गुडघे बदल, खुबा बदल शस्त्राक्रिया तसेच अपघातामधील रुग्णांनाही या योजनेतून आर्थिक मदत दिली जात आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना म्हणजे २०१४ ते मार्च २०१९ या काळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून लक्षावधी रुग्णांना मदत करण्यात आली होती. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही मदत करण्यात आली होती. परिणामी पाच वर्षात काही लाख रुग्णांना आर्थिक मदत मिळू शकली. यात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या माध्यमातून ५७५ कोटी रुपयांची मदत करण्यात आली तर ४७४ धर्मादाय रुग्णालयाच्या माध्यमातून जवळपास १२०० कोटी रुपयांची मदत केल्याचे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे तत्कालीन प्रमुख ओमप्रकाश शेट्ये यांनी सांगितले.

धर्मादाय रुग्णालयांमध्ये दहा टक्के खाटा या गरीब रुग्णांना मोफत उपचारासाठी तर दहा टक्के खाटा या दुर्बल घटकातील लोकांना पन्नास टक्के सवलतीच्या दरात उपचारासाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांनी धर्मादाय रुग्णालयात किती गरीब रुग्णांना उपचार केले जातात याचा आढावा घेऊन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षच्या माध्यमातून याचे नियोजन व नियंत्रण करण्यास सुरुवात केली. यासाठी या कक्षेत स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करण्यात आला होता. यामुळे कोणत्या धर्मादाय रुग्णालयात किती खाटा या योजनेत उपलब्ध आहे व किती लोकांना मदत मिळते याची रोजची माहिती उपलब्ध होऊ लागली. परिणामी राज्यातील ४७४ धर्मादाय रुग्णालयांच्या माध्यमातून लाखो गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांना फडणवीस यांनी वैद्यकीय मदत मिळवून दिली होती. यात कॉक्लिअर इंप्लांट व लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया प्राधान्याने करण्यात आल्या होत्या.


मुख्यमंत्री शिंदे यांनी या योजनेत अनेक नवीन आजारांचा समावेश केला आहे. तसेच जन्मतः कर्णबधिर मुलांच्या कॉक्लिअर इंप्लांट शस्त्रक्रियेसाठी तीन लाख रुपये या योजनेतून मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थिक मदत देण्यासाठी पाच प्रकारचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. यात हृदय शस्त्रक्रिया, फुफ्फुस प्रत्यारोपण, बोनमॅरो व हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी दोन लाख रुपयांपर्यंत मदत दिली जाणार आहे. गुडघा वा खुबा बदल शस्त्रक्रिया, मेंदू रोग, कर्करोग, लहान बालकांचे आजार, अपघातातील शस्त्रक्रिया आदीसाठी एक लाख रुपयांपर्यंत मदत केली जाईल तर डायलिसिस, केमोथेरपी, जळीत रुग्ण, अस्थिबंधन आदींसाठी ५० हजार रुपये मदत मिळेल. या शिवाय अन्य आजारांसाठी आवश्यकतेप्रमाणे २५ हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. वरील निकषात कोणते रुग्ण बसू शकतात व त्यांना नेमकी किती मदत दिली जावी हे निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात तज्ज्ञ डॉक्टरांची एक समिती नेमण्यात आली असून ती याबाबत निर्णय घेते असे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले.

## पोक्सोंमधील पीडितांचे जबाब नोंदवण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांना तारखा

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

लहान मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण (पोक्सो) कायद्यांर्तगत पीडित मुलांचा जबाब महानगरदंडाधिकाऱ्यांनी घटनेनंतर लगेचच नोंदवणे अनिवार्य आहे. असे असतानाही महानगरदंडाधिकाऱ्यांकडून प्रत्येक पोलीस ठाण्याला हे असे जबाब नोंदवण्यासाठी विशिष्ट तारखा दिल्या जात असल्याची बाब उघड झाल्यानंतर उच्च न्यायालयाने या प्रथेबाबत गुरूवारी संताप व्यक्त केला.

साकीनाका येथील तीन वर्षाच्या मुलीवर नववीत शिकणाऱ्या मुलाने लैंगिक अत्याचार केल्याच्या घटनेप्रकरणी दाखल याचिकेवरील सुनावणीवेळी महानगरदंडाधिकाऱ्यांकडून पोक्सोसह बलात्कार प्रकरणातील पीडितांचे जबाब नोंदवण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांना तारखा दिल्या जात असल्याची बाब उघड झाली. त्याबाबत न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. न्यायदंडाधिकारी न्यायालयासमोर पीडित मुलीचा जबाब नोंदवण्यात आला का, अशी विचारणा न्यायालयाने सरकारी वकिलांना केली. त्यावर, १५ ऑगस्ट रोजी मुलीचा जबाब नोंदवण्याची विनंती संबंधित महानगरदंडाधिकाऱ्यांना करण्यात आली होती. परंतु, महादंडाधिकाऱ्यांनी त्यासाठी १३ सप्टेंबरची तारीख निश्चित केली. न्यायालयाने महानगर दंडाधिकाऱ्यांच्या निर्णयाबाबत आश्चर्य व्यक्त केले. तेव्हा, मुंबईतील महानगरदंडाधिकाऱ्यांकडू




न पोक्सोवगळता अशा प्रकरणात पीडितेचे जबाब नोंदवण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यांना तारखा निश्चित करून दिल्या जात असल्याचे सांगण्यात आले. न्यायालयाने महानगरदंडाधिकाऱ्यांकडून चालवल्या जाणाऱ्या या प्रथेबाबत टीका केली. तसेच, ही प्रथा निषेधार्ह असल्याचे म्हटले. त्याचप्रमाणे, पोलिसांनी विनंती केल्यानंतर महानगरदंडाधिकाऱ्यांनी पीडित मुलीचा जबाब तीन-चार दिवसांतच नोंदवणे अनिवार्य आहे, त्यानंतर नाही, असेही सुनावले. दरम्यान, हे प्रकरणदेखील बदलापूर येथील घटनेशी साधर्म्य साधणारे आहे. त्यामुळे, या प्रकरणीही न्यायालयाने स्वतःहून याचिका दाखल करून घेण्याची विनंती मुलीच्या पालकांच्या वतीने वकील अमित कटनवरे यांनी न्यायालयाकडे केली. तथापि, प्रत्येक प्रकरणाची दखल घेऊन न्यायालय स्वतःहून याचिका दाखल करून घेऊ शकत नाही. तसेच, बदलापूर प्रकरणात पोलिसांनी काहीच कारवाई केली नाही. या प्रकरणी पोलिसांनी निदान तत्परतेने कारवाई केल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. घटनेची तक्रार नोंदवण्यासाठी गेलेल्या पीडित मुलीच्या कुटुंबीयांना साकीनाका पोलिसांनी अपमानास्पद वागणूक दिली व तक्रार दाखल करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, याचीही न्यायालयाने गंभीर देखल घेतली. तसेच, पोलिसांवरील आरोपांमध्ये तथ्य असून पोलिसांची कृती असंवेदनशील असल्याचे ताशेरेही ओढले.

## मुंबई- गोवा महामार्ग पूर्ण होण्यास आणखी दोन वर्षे; सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांची कबुली

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

मुंबई- गोवा महामार्गाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून करण्यात येत आहे. या कामाचे १० टप्पे असून त्यासाठी वेगवेगळे कंत्राटदार नेमले आहेत. काही चुकीच्या कंत्राटदारांमुळे या प्रकल्पाचे काम रखडले आहे. या महामार्गाचे काम पूर्ण होण्यास अजून किमान दोन वर्षे लागतील अशी कबुली सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी येथे दिली. मुंबई- गोवा महामार्गाच्या दुरावस्थेवरून सार्वनिक बांधकाम विभागावर सर्वच स्तरांतून टीका होत असताना चव्हाण यांनी मात्र या महामार्गाच्या दुरवस्थेस राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण जबाबदार असल्याचे सांगितले. या महामार्गावरील राजापूर



ते गोवापर्यंतचा महामार्ग चांगला झाला असून संगमेश्वर ते राजापूर दरम्यानचे काम रखडले आहे. या महामार्गावर छोटे-मोठे १४ पूल आहेत. तसेच या रस्त्याला अनेक सेवा रस्ते आहेत. यामुळेच कामाला विलंब होत आहे. या रस्त्याचे काम करणाऱ्या काही कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले. या ठिकाणी दुसरे कंत्राटदार नेमण्यात आले. मात्र त्यांनीही काम केले नाही. उपठेकेदार काम करत नसल्याने हा गोंधळ झाला आहे. तसेच या कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे अधिकार राज्याच्या बांधकाम विभागाला नाहीत. केवळ देखरेख करण्याची जबाबदारी आहे. तरीही लवकर हे काम पूर्ण करून घेतले जाईल, असे चव्हाण यांनी सांगितले.

## सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाचे काम सुरू; सांजा, वडगाव, तुळजापूरला नवे रेल्वेस्थान

■ **सोलापूर : प्रथमेश चव्हाण**

धाराशिव : सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वेमार्गाचे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले स्वप्न आता प्रत्यक्ष साकार होत आहे. एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या कामाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. धाराशिव ते तुळजापूर या पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वेमार्गाच्या कामास शनिवारी प्रारंभ झाला. भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी वाहन व यंत्रांचे नारळ फोडून पूजन केले. लवकरच दुसरा आणि तिसरा टप्पा सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला शब्द पाळला आहे. दोन वर्षांच्या आत तुळजाभवानी एक्सप्रेसचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

शनिवारी धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) शिवारात रेल्वेमार्गाच्या कामास प्रत्यक्ष सुरूवात झाली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोलापूर-तुळजापूर-धाराशिव हा रेल्वेमार्ग जाहीर केला होता. या नवीन मार्गाचे काम २०१९ सालीच सुरू होणे अपेक्षित होते. मात्र तत्कालीन राज्य सरकारने राज्याच्या वाट्याचा पन्नास टक्के निधी उपलब्ध करून दिला नव्हता. त्यामुळेच अडीच वर्षे हे काम रखडले असल्याचा आरोप भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केला आहे. सत्तांतर झाल्यानंतर शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर या रेल्वेमार्गासाठी ४५२.४६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली. त्यामुळे आता प्रत्यक्ष कामाला आता गती आली आहे. सुरूवातीला पाच वर्षांत हे काम पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र आता तीन टप्प्यांत कमी कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम शनिवारी सुरू झाले. उर्वरित दोन टप्प्यांचे कामही लवकरच हाती घेण्यात येणार असल्याची माहिती यावेळी आमदार पाटील यांनी दिली. पुढील दोन वर्षांच्या आत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात



आले असल्याचे संबंधित अधिकारी आणि काम करणाऱ्या कंपनीने जाहीर केले आहे. पहिल्या टप्प्यातील कामासाठी धाराशिव तालुक्यातील नऊ आणि तुळजापूर तालुक्यातील १५ गावांमधील ४९४.२६ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात बोगद्याच्या कामांना हाती घेण्यात येणार आहे. सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या एकूण ८४ किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. त्यात धाराशिव जिल्ह्यातील कामाचे दोन स्वतंत्र टप्पे केले आहेत. या रेल्वेमार्गावर एकूण ११० पूल आणि तीन मोठे उड्डाणपूल असणार आहेत. सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील ३२ गावांतील एक हजार ३७५ एकर जमीन त्यासाठी भूसंपादीत करण्यात आली आहे. संपादीत जमिनीच्या वाढीव मावेजासाठी दोन्ही जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**धाराशिव-तुळजापूर ब्रॉडगेजसाठी ५४४ कोटींचा खर्च**

पहिल्या टप्प्यातील ३० किलोमीटरच्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गासाठी ५४४ कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. जास्तीत जास्त ३० महिन्यांच्या आत हा रेल्वेमार्ग पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे. या मार्गावर सांजा, वडगाव आणि तुळजापूर, असे तीन नवीन रेल्वेस्थानक उभारले जाणार आहेत. या रेल्वेमार्गामुळे तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर येणार आहे. धाराशिव-तुळजापूर या ३० किलोमीटर रेल्वेमार्गावर तीन नवीन रेल्वेस्थानके उभारली जाणार आहेत. धाराशिव ते सांजा या १० किलोमीटर अंतरावर सांजा येथे पहिले रेल्वे स्थानक असणार आहे. सांजा ते वडगाव या १२ किलोमीटर अंतराच्या टप्प्यावर दुसरे रेल्वेस्थानक तर वडगाव ते तुळजापूर या आठ किलोमीटर अंतरावर तिसरे स्थानक उभारले जाणार आहे. या रेल्वेमार्गावर एकूण चार स्थानके असणार आहेत. त्यात धाराशिव येथील सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रेल्वेस्थानकाचाही समावेश आहे.

## जरांगे यांचे आंदोलन महाविकास आघाडीच्या फायद्यासाठी – राजेंद्र राऊत

■ **सोलापूर : राकेश गायकवाड**

मराठा आरक्षण आंदोलनाच्या प्रश्नावर बार्शीचे भाजपा पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांना पुन्हा आव्हान देत, त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या बाजूने फायदा होण्यासाठी



आंदोलनाची ढाल पुढे करीत असल्याचा आरोप केला आहे. जरांगे यांचा मराठा प्रश्नावर आंदोलनात प्रामाणिकपणा नसेल तर त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागेल, इशारा दिला आहे. जरांगे यांचे आंदोलन सुरू झाल्यानंतर त्यांच्यासोबत सुरुवातीच्या चर्चेत राऊत सहभागी झाले होते. लोकसभा निवडणुकीनंतर काही दिवसांपूर्वी जरांगे यांच्यावर एका कार्यक्रमातून टीका केली होती. आज पुन्हा एकदा बार्शी येथे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना त्यांनी जरांगे यांच्यावर टीकास्त्र सोडत इशारा दिला आहे. राऊत यांनी यावेळी आक्रमक शैलीत जरांगे यांच्यावर कडवी टीका केली. ते म्हणाले, की आमचे राऊत घराणे छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यासाठी रक्त सांडणारे आहे. यामुळे जर जरांगे हे खंडोजी खोपडेंच्या भूमिकेत महाविकास आघाडीच्या फायद्यासाठी आंदोलनाच्या नावाखाली राजकारण करणार असतील तर आम्ही गप्प बसणार नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात नोंद होईल असे करून दाखवू, या मराठा छाव्याला तुम्ही डिवचण्याचा प्रयत्न केला तर त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. जरांगे यांनी प्रामाणिक भूमिकेतून बार्शीत येऊन मराठा आरक्षण प्रश्नावर सभा घ्यावी. त्यांचे आपण स्वागत करू, अशीही भूमिका त्यांनी मांडली.

## चार विशाल प्रकल्पांना मान्यता; एक लाख १७ हजार २२० कोटींची गुंतवणूक

■ **मुंबई : यश सावंत**

मराठवाडा, विदर्भ, पुणे आणि पनवेल येथे एक लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या उच्च तंत्रज्ञानावर आधारित चार विशाल प्रकल्पांना गुरुवारी उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत मान्यता देण्यात आली. सेमीकंडक्टर, विद्युत वाहन निर्मितीमधील या गुंतवणूक प्रकल्पांतून २९ हजार रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.



उच्च तंत्रज्ञानावर आधारित सेमीकंटक्टर निर्मितीसाठी पनवेलमध्ये 'टॉवर सेमीकंडक्टर कंपनी' व 'अदानी समूहा'चा संयुक्त प्रकल्प साकारणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ५८ हजार ७६३ कोटी तर दुसऱ्या टप्यात २५ हजार १८४ कोटी अशी एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून तेथे १५ हजार रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. पुणे येथे 'स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया' कंपनीचा प्रकल्प एकात्मिक पध्दतीने स्थापना करण्यास गुरुवारी राज्य सरकारने मान्यता दिली. या प्रकल्पात १२ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार असून एक हजार रोजगार निर्मितीचे लक्ष्यआहे. प्रकल्पातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विद्युत वाहनांची निर्मिती केली जाणार आहे. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये 'टोयोटा- किर्लोस्कर मोटर कंपनी'चा विद्युत वाहन निर्मिती प्रकल्पही सुरू होणार आहे. यात २१ हजार २७३ कोटींची गुंतवणूक आणि १२ हजार रोजगार निर्मिती होईल. गुरुवारी मंजुरी मिळालेला तिसरा प्रकल्प वस्त्रोद्योग क्षेत्रातील आहे. या प्रकल्पाचा सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग घटकांनाही फायदा होणार आहे. अमरावती जिल्ह्याच्या नांदगाव पेठ अतिरिक्त औद्योगिक विकास महामंडळ वसाहतीमध्ये 'रेमंड लक्झरी कॉटन्स'चा स्पिनींग, यार्न डाइंग, विव्हींग ज्यूट, विव्हींग कॉटन, ज्यूट, मेस्टा, कॉटन उत्पादनांचा विशाल प्रकल्प मंजूर झाला आहे. यातून ५५० रोजगार निर्मिती होणार असून त्यासाठी १८८ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग मंत्री उदय सामंत (दूरचित्र संवादाच्या माध्यमातून), मुख्य सचिव सुजाता सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते. सेमीकंडक्टर आणि विद्युत वाहन निर्मितीमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे 'विद्युत वाहन निर्मिती क्षेत्रामध्ये अग्रेसर राज्य' अशी महाराष्ट्राची ओळख निर्माण होईल. प्रकल्पांमुळे एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय
Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६
ई-निविदा सुचना क्र. १० सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दरे (ऑनलाईन) निविदा मार्गवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई. यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | सर ज.जी. समूह रुग्णाल, मुंबई या संस्थेच्या आवारातील दिनशा माणेकजी पेटीट इमारत येथील मंबलोरी कौलारु छप्पराचा जीर्णोध्दार व संवर्धन करणे बाहय दर्शन दगडी भिंतीची दुरुस्ती करणे. | ३,१४,१९,७४६/- |

(एकूण ०१ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०५/०९/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १२/०९/२०२४ रोजी १५.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक : दिनांक १०/०९/२०२४ रोजी दुपारी १५.०० वाजता
मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां) प्रादेशिक विभाग,
बांधकाम भवन, ४ था मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १३/०९/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ८४५२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ०२/०९/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२६५४

# 'मीही आता ६५ वर्षांचा झालोय', अजित पवारांचं बारामतीमध्ये सूचक विधान; म्हणाले, 'पिकतं तिथे विकत नसतं'!

■ **मुंबई : सम्यक कासारे**

महाराष्ट्रात सध्या आगामी विधानसभा निवडणुकांची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. राज्यात निवडणुका नेमक्या कधी होणार? याची उत्सुकता मतदारांप्रमाणेच राजकीय पक्ष व त्यांच्या कार्यकर्त्यांनाही लागली आहे. जम्मू-काश्मीर व हरियाणाच्या निवडणुका आयोगानं आधी जाहीर केल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुका दिवाळीआधी की दिवाळीनंतर? यासंदर्भात तर्क-वितर्क लावले जात आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून राज्यभर मतदारांशी संवाद साधला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज बारामतीमध्ये पक्षकार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकीबाबत सूचक विधान केलं आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना महायुतीकडून तिकीट देण्यात आलं होतं. मात्र, सुप्रिया सुळेंसमोर त्यांचा पराभव झाला. खुद्द अजित पवारांच्या बारामती मतदारसंघातून सुप्रिया सुळेंना सर्वाधिक मताधिक्य मिळालं. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकांवर याचा परिणाम होणार असे अंदाज वर्तवले जात होते. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी बारामतीमधून निवडणूक लढवण्यास इच्छुक नसल्याचं सांगितल्यानंतर तर्क-वितर्कांना उधाण आलं. त्याचसंदर्भात अजित पवारांनी आज बारामतीमध्ये बोलताना भाष्य केलं. अजित पवारांनी यावेळी लवकरच निवडणुकांची घोषणा होणार असल्याचे सूतोवाच केले. 'मागचं सरकार २०१९ च्या निवडणुकीत २६ नोव्हेंबरला स्थापन झालं होतं. त्यामुळे नवीन सरकार २६ नोव्हेंबरच्या आत स्थापन झालं



पाहिजे असा एक नियम आहे. निवडणूक आयोग कधी निवडणूक घेईल माहिती नाही. खूप जण निधीची मागणी करत आहेत. पण आता मी निधीसाठी फाईलवर रिमार्क काहीही दिला, तरी तो मंजूर होईपर्यंत आचारसंहिता लागेल. त्यामुळे सगळ्यांनी याचा विचार करावा', असं अजित पवार म्हणाले आहेत. 'बारामतीत आपण सर्वांगीण विकास केला. राज्यात सर्वाधिक निधी दिला. मीही एक माणूस आहे. मला कधीकधी विचार येतो की एवढी सगळी कामं करूनही बारामतीकर वेगळा निर्णय घेऊ शकतात. आता मलाही राजकारणात ३३-३४ वर्षं झाली आहेत. मी तर आता दुसरा खासदार राज्यसभेवर पाठवू शकतो. त्याआधी संसदीय समितीनं सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेलांना उमेदवारी दिली होती. मध्ये राजेश विटेकरला आमदार केलं. शिवाजीराव गर्जेंना केलं. आता राज्यपाल नियुक्त आमदारांचं काय होतंय माहिती नाही. पण जर यंदाच्या निकालांसारखी गंमत होणार असेल तर आपली झाकली मूठ सव्वा लाखाची म्हणायचं', अशी टिप्पणी अजित पवारांनी केली.

दरम्यान, आजपर्यंतच्या कारकिर्दीवर आपण समाधानी असल्याचं अजित पवार यावेळी म्हणाले. 'आता मीही ६५ वर्षांचा झालोय. मी समाधानी आहे. जिथे पिकतं, तिथे विकत नसतं. एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा. मग तुम्ही ९१ ते २०२४ च्या माझ्या कारकिर्दीची आणि त्या नव्या माणसाच्या कारकिर्दीची तुलना करा', असं आवाहन अजित पवारांनी केलं आहे.

# गणेशोत्सवात दिवसा अवजड वाहनांना निर्बंध

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

गणेशमुर्ती आगमन आणि विसर्जनाच्या दिवशी ठाण्यात मिरवणूका निघतात. तसेच विसर्जन स्थळी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अवजड वाहनांच्या प्रवेशामुळे शहरात वाहतुक कोंडी होऊ नये म्हणून ठाणे वाहतुक पोलिसांनी गणेशोत्सवात अवजड वाहनांना निर्बंध लागू केले आहेत. गणेशोत्सवाच्या कालावधीत दिवसा अवजड वाहनांना बंदी असणार असून केवळ रात्री १० नंतर प्रवेश दिला जाईल. तर गणेशमुर्ती विसर्जनाच्या दिवशी अवजड वाहनांना पूर्णतः प्रवेशबंदी असेल. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी हे आदेश काढले आहेत. त्यामुळे नागरिकांना अवजड वाहनांच्या वाहतुकीपासून दिलासा मिळणार आहे. ठाणे



आयुक्तालय क्षेत्रातील भिवंडी भागात मोठ्याप्रमाणात गोदामे आहेत. त्यामुळे उरण येथील जेएनपीटी बंदरातून सुटणारी हजारो अवजड वाहने भिवंडीतील गोदामांमध्ये जात असतात. तसेच गुजरात, नाशिकच्या दिशेने वाहतुक करणारी अवजड वाहने मुंबई नाशिक महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण आणि घोडबंदर मार्गे वाहतुक करत असतात. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या कालावधीत प्रवेश असतो. असे असले तरी अनेकदा अवजड वाहनांची या वेळेव्यतिरिक्त नियमबाह्य पद्धतीने घुसखोरी होत असते. त्यामुळे शहरात वाहतुक कोंडीचा सामना ठाणेकरांना सहन करावा लागतो.

# खारघरच्या मेडिकवर रुग्णालयात केमोथेरपी घेणाऱ्यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळणार

■ **पनवेल: धनश्री सट्टा**

खारघर येथील मेडिकवर रुग्णालयात कर्करोगावरील केमोथेरपी करून आता त्याच दिवशी घरी जाता येणार आहे. शुक्रवारी दुपारी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या उपस्थितीत या वार्डाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी चिवटे यांनी या रुग्णालयात किमोथेरपी घेणाऱ्या सर्व रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाईल तसेच कर्करोगासंबंधीत शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत करणार आणि अवयव प्रत्यारोपण सारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची मदत केली जाईल अशी घोषणा चिवटे यांनी केली. कर्करोगाशी लढा देणाऱ्या रुग्णांसाठी तसेच केमोथेरपी घेत असलेल्या रुग्णांसाठी नवी मुंबईच्या खारघर येथील मेडिकवर रुग्णालयाने सुरक्षित आणि उत्तम दर्जाच्या सुविधा देण्यासाठी केमो डे केअर वॉर्ड सुरू केला असून या नवीन सुविधेमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने एकाच वेळी १५ रुग्ण




केमोथेरपी उपचार घेऊ शकतील. मेडिकवर रुग्णालयाकडून केवळ रोगावर उपचार करण्यासाठीच नव्हे तर, या आव्हानात्मक काळात रुग्णांना होणारा त्रास, त्यांची गैरसोय कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात असल्याचे रुग्णालयाचे केंद्र प्रमुख डॉ. माताप्रसाद गुप्ता यांनी सांगीतले. कर्करोगाच्या रूग्णांना केमोथेरपीनंतर प्रकृती स्थिर झाल्यावर घरी परतणे हा प्रवास खूप त्रासदायक असल्याने रुग्णांना सर्वाधिक अशक्तपणा येतो. यासाठी रुग्णांना केमोथेरपीनंतर त्याच दिवशी घरी परतण्यासाठी केमो डे केअर वॉर्डचा अभिनव उपक्रम मेडीकवरने केला आहे. या रुग्णालयात कर्करोगाचे उच्च दर्जाचे व यशस्वी उपचार केले जातील असा विश्वास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी व्यक्त केला. नवीन डे केअर वॉर्ड हे कर्करोगाच्या रूग्णांसाठी उपचार पद्धती बदलत आहे. हा वॉर्ड रुग्णांसाठी सोयी आणि आराम या दोन्ही गोष्टींना प्राधान्य देतो. केमोथेरेपी घेतल्यानंतर त्याच दिवशी ते घरी जाऊ शकतात हे रुग्णांना दिलासा देणारे आहे. वॉर्ड रुग्णांना आणि त्यांच्या प्रियजनांना केमोथेरपी-संबंधित दुष्परिणामांना प्रतिबंध आणि व्यवस्थापनाबाबत शिक्षित करेल.

# जातगणनेची जालीम मात्रा

आरक्षण व त्याभोवतीचे राजकारण याच्याशी संबंध असल्याने जातगणना हा मुद्दा केवळ प्रशासकीय न राहता राजकीयदृष्ट्या कमालीचा संवेदनक्षम बनला आहे. पण तसा तो आहे म्हणून टाळणे हे देशाच्या हिताचे नाही. मधुमेहाची बाधा उघड होऊन नीरस पथ्यकर जिणे नशिबी येईल, या भीतीने रक्ततपासणी टाळणाऱ्या मनुष्यासारखी सध्या देशाची अवस्था झाली आहे. अज्ञानात आनंद मानून जमेल तसे यथेच्छ जगावे, हा दृष्टिकोन आरोग्यपूर्ण म्हणता येणार नाही. जातिनिहाय जनगणना ही अशीच एक तपासणी आहे, जिच्यात आपल्या सामाजिक विणीचा पोत जरतारी आहे की, जाडाभरडा हे वास्तव उघड होईल. जातिनिहाय जनगणनेमुळे जे काही नव्याने भोगावे लागेल, त्याची तयारी नसल्याने सत्ताधारी असल्या भानगडीत पडत नाहीत आणि सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्यासाठी विरोधक मात्र त्या गणनेची मागणी लावून धरतात.

२०२१ मध्ये अपेक्षित असलेली सर्वसाधारण जनगणनाही झालेली नसल्याने आर्थिक-सामाजिक वास्तव कळण्यात एक मोठा अडथळा निर्माण झाला आहे. कल्याणकारी योजना, अन्य धोरणात्मक नियोजन यासाठी अशा माहितीची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे जनगणना आणि त्या बरोबरीने जातगणना होणे आवश्यक आहे. पण आरक्षण व त्याभोवतीचे राजकारण याच्याशी त्याचा संबंध असल्याने जातगणना हा मुद्दा मात्र केवळ प्रशासकीय न राहता राजकीयदृष्ट्या कमालीचा संवेदनक्षम बनला आहे. तसा तो आहे म्हणून टाळणे हे देशाच्या हिताचे नाही. वास्तवाला भिडणे हाच विवेकाचा मार्ग आहे. देशातली एकशेचाळीस कोटी लोकसंख्या कुठल्या कुठल्या स्तरात विखुरली गेली आहे, त्यांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती कशी आहे, हे कळण्याचा मार्ग जातिनिहाय जनगणना हा आहे. सत्याच्या जवळ नेणारी ही आकडेवारी दीर्घकालीन भवितव्यासाठी गरजेची आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकारिणीच्या सभेनंतर झालेल्या पत्रकारपरिषदेत यंदा प्रथमच 'जातिनिहाय जनगणनेला संघाचा विरोध नाही', अशी भूमिका मांडली गेली. जातगणनेला पाठिंबा देण्याची भूमिका घेतानाच संघाने याचा राजकीय अस्त्रासारखा वापर होऊ नये, असे आवाहन केले.

पण राजकीय पक्ष त्यानुसार वागण्याची शक्यता सूतराम नाही. भाजपच्या राजवटीलाही दशक पूर्ण झाले. संपूर्ण बहुमतानिशी दहा वर्षे कारभार



करुनही जातगणनेसारखे धाडसी पाऊल उचलणे मोदी सरकारने टाळले. उलटपक्षी २०११ मध्ये काँग्रेसच्या काळात झालेल्या जनगणनेतील जातपाहणीची तपशीलातील माहिती जाहीर न करण्यातच शहाणपण मानले. या शिरगणतीत सामाजिक-आर्थिक आणि जातीय गणना झाली होती. २०१५मध्येदेखील असाच प्रयत्न झाला होता. पण ही आकडेवारी कधीच उघड करण्यात आली नाही. पुढे सर्वोच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्रात सदरील गणना सदोष असल्यामुळे आकडेवारी विश्वासार्ह नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले होते. जातिनिहाय जनगणना प्रशासकीय पातळीवरही करणे कठीण असल्याचे केंद्राचे म्हणणे होते. यात तथ्य नसावे. कारण निवडणूक आयोगासारखी यंत्रणा इतका प्रचंड कार्यक्रम कमी कालावधीत राबवू शकते, तर जनगणनेसाठीची यंत्रणा दुबळी आहे, यावर विश्वास कसा ठेवावा? जातगणनेचा सर्वाधिक लाभ ध्रुवीकरणावर अवलंबून असलेल्या प्रादेशिक पक्षांनाच होतो, हे उघड सत्य असल्याने त्यांच्याकडूनच ही मागणी वारंवार होते. राष्ट्रीय पक्षांना मात्र या आकडेवारीचे भय वाटणे स्वाभाविक आहे.

अनेक वर्षे राजवट भोगून झाल्यावर काँग्रेस पक्षाला जातिगणना ही अत्यंत आवश्यक बाब असल्याचा साक्षात्कार विरोधी बाकांवर बसल्यानंतर झाला. पण ही झाली मतदानापुरती मर्यादित बाब. जातनिहाय जनगणनेतून बाहेर येऊ पाहणारे वास्तव देशाच्या सामाजिक विणीचे किती नुकसान करु शकेल, हा गंभीर मुद्दा आहे. भारताची घटना लोकसंख्या मानते, पण जात, धर्म यांना स्थान देत नाही. जनगणनेत तेही गृहित धरणे, हे घटनेच्या विरोधात जाईल, असा युक्तिवाद काही लोकशाहीवादी करतात. जातिगणनेचे समर्थक मात्र या भूमिकेची खिल्ली उडवतात. हा ताकाला जाऊन भांडे लपवण्याचा प्रकार सोडून वास्तवाला भिडले पाहिजे अशी त्यांची धारणा आहे. ब्रिटिश राजवटीत १८७२ पासून भारतात जनगणना होत होती, तेव्हाही जात-धर्म नोंदवून घेतले जात होते. १९३१च्या जनगणनेपर्यंत हे चालले. परंतु, स्वतंत्र भारतात मात्र जातगणना टाळली गेली. १९८०च्या सुमारास अनेक प्रादेशिक पक्ष डोके वर काढू लागले, त्यापैकी काहींनी तर आक्रमकपणे राष्ट्रीय अवकाशदेखील अंशतः व्यापला. जातगणनेची जोखीम भाजप सरकारने आधीच पत्करायला हवी होती. कारण प्रचंड बहुमताची ताकद या पक्षाकडे होती. आता राजकीय परिस्थिती बिकट झाली असताना, संघासारख्या मातृसंस्थेने जातगणनेच्या मागणीला पाठबळ द्यावे, हे लक्षणीय आहे. हिंदूधर्मातील ताणतणाव, मतभेद सतरंजीखाली दडवून हिंदूऐक्याचा पुकारा संघ करतो, ही टीका संघावर नेहेमीच होत आली आहे.

# परग्रहावरील 'वॉव' संकेताचा सारीपाट

हे विश्व अफाट आहे. हायड्रोजन या मूलद्रव्याने आच्छादलेले आहे. त्यामुळे कुठेतरी जीवसृष्टी असेल आणि तीही हायड्रोजनचा उपयोग संकेतासाठी करीत असेल, असे शास्त्रज्ञांना वाटते. पुनरुज्जीवित झालेल्या 'सेटी' प्रकल्पाची यासंदर्भात माहिती.

मानवी मेंदूने आपला परीघ विश्वात दूरपर्यंत विस्तारल्याने, पृथ्वीव्यतिरिक्त अणखी कुठे जीवसृष्टी असेल का याचा तो विचार करू लागला आहे. म्हणूनच आपण या विश्वात एकटे आहोत का? हा प्रथम विचार साधारण दोन हजार वर्षापूर्वी ग्रीक तत्त्ववेत्त्यांच्या मनात आला. तंत्रज्ञान नसल्याने त्याचा पाठपुरावा होऊ शकला नाही. पण आज या आधुनिक व तंत्रज्ञानयुगात त्याचा पाठपुरावा होताना दिसतो आहे.

पृथ्वीव्यतिरिक्त इतर कुठे जीवसृष्टी असेल का याचा सखोल अभ्यास होताना दिसतो आहे. फ्रॅंक ड्रेक या शास्त्रज्ञाचा प्रयत्नातून १९६०मध्ये 'सेटी' म्हणजेच 'सर्च फॉर एक्स्ट्रा टेरेस्ट्रियल इंटेलिजन्स' या प्रकल्पाची बांधणी झाली आणि त्या माध्यमातून पृथ्वीव्यतिरिक्त प्रगत जीवसृष्टीच्या विविध अंगांनी शोधाला सुरुवात झाली. विज्ञानकथांमध्ये आपण पाहतो की, परग्रहावरील मानवाशी आपला संपर्क पूर्णपणे निःसंदिग्ध असतो, की ज्यात एखादे विशाल यान पृथ्वीवर अवतरून, परग्रहीय अभिवादन करतात किंवा एखादा अनभिज्ञ संकेत प्राप्त होऊन आपण त्याचे आत्मविश्वासाने विश्लेषण करू शकतो. परंतु प्रत्यक्षात अशा अलौकिक बुद्धीचा शोध लावणे महाकठीण आहे. ते काम 'सेटी' नावाचा प्रकल्प हिरीरीने करतो आहे.

या प्रकल्पाशी बऱ्याच दुर्बिणी जोडल्या गेल्या आणि त्यांच्या साह्याने संकेतांचे प्रक्षेपण व ग्रहण या दोघांचा सखोल अभ्यास होऊ लागला. यात हजारो प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या आकाशगंगांच्या संकेताचाही अभ्यास होऊन विश्लेषण होऊ लागले. यात ड्रेक यांचा सहभाग मोठा होता.



याचदरम्यान साधारण १९७७ मध्ये एहमन नावाचे शास्त्रज्ञ 'सेटी' प्रकल्पावर काम करीत होते. त्याचे मुख्य कार्य हे अंतराळातून विविध आकाशगंगेतून येणारे संकेत व माहितीचे विश्लेषण करणे हे होते. यामधे 'आयबीएम-११३०' संगणकाने मिळविलेल्या मोठ्या माहितीचा समावेश होता आणि त्याचे आलेखन कागदावर होत होते.

याच माहितीचा पाठपुरावा करताना १५ ऑगस्ट १९७७ रोजी मधील 'बिग इअर रेडिओ ऑब्झर्वेटरी' येथे अलौकिक बुद्धिमत्तेचे चिन्हे शोधताना तो संकेत एहमन यांना सापडला. तो सिग्नल खरोखरच असामान्य असाच होता आणि काही दिवसानंतर डेटाचे पुनरावलोकन करताना खगोलशास्त्रज्ञ जरी एहमन यानी सहजपणे त्याचं सांकेतिक कागदावर लिहिले आणि म्हणाले 'वॉव'.. आणि हा संकेत परग्रहावरील जीवसृष्टीने पाठविल्याचे भाकीत केले गेले.

तेव्हापासून आजपर्यंत ४० वर्षात बऱ्याच शास्त्रज्ञांनी असा दावा केला आहे की 'वॉव' संकेत हा परग्रहवासीयांकडूनच आलेला होता. इतर शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, हा 'वॉव' संकेताचा उगम हा ताऱ्यांच्याच उत्सर्जनातून निर्माण झालेला आहे. त्यामुळे बऱ्याच शास्त्रज्ञांनी 'वॉव' संकेत कशामुळे आला असावा, याबद्दल सिद्धांत मांडले. परंतु कोणतेही स्पष्टीकरण मान्य केले गेले नाही. आता मात्र फ्लोरिडा येथील सेंट पीटस् बर्ग कॉलेजमधील खगोलशास्त्राचे प्राध्यापक ॲटेनियो पॅरिस यांनी 'वॉव' संकेत बहुधा धूमकेतूने निर्माण केला असावा, असा निष्कर्ष काढला आहे. पॅरिस आणि त्यांच्या टीमला कळले की दोन धूमकेतूंनी जेव्हा प्रवास केला तेव्हा 'वॉव संकेत' लक्षात आला. म्हणूनच त्यांचा विश्वास दृढ झाला की हा संकेत एका किंवा दुसऱ्या धुमकेतूच्यासोबत असलेल्या हायड्रोजन ढगातून आला आहे.

पॅरिस यांनी पुन्हा १० मीटर रेडिओ दुर्बिणीचा वापर करून धनु राशीभोवतीच्या आकाशाच्या प्रदेशाचे सर्वेक्षण केले आणि तेथून निर्माण झालेले संकेत हे 'वॉव संकेता'शी साधर्म्य दाखवत होते. या संकेताची प्रखरता जरी कमी असली तरीसुद्धा त्याचे साधर्म्य हे ''वॉव'' संकेताशी असल्याची पडताळणी त्यांनी केली आणि निष्कर्ष काढला की १९७७ चा 'वॉव' संकेत ही धूमकेतूने निर्माण केलेली नैसर्गिक घटना होती.

कॉर्नेल विद्यापीठाचे शास्त्रज्ञ मॉरिसन यांनी १९५९मध्ये असे म्हटले होते की, रेडिओ सिग्नलद्वारे संवाद साधण्याचा प्रयत्न करणारी कोणतीही प्रगत जीवसृष्टी ही १४२० मेगाह''हट्‌झ (२१ से.मी. स्पेक्ट्रललाईन) ची वारंवारता वापरू शकते. कारण ही नैसर्गिकरीत्या हायड्रोजनद्वारे उत्सर्जित होते. विश्वातील हा सर्वात सामान्य घटक असल्याने उपलब्ध असलेल्या सर्व प्रगत जीवसृष्टींना याची जाण असावी. बहुतांशी पृथ्वीबाहेरील सजीवसृष्टी ही नॅरोबॅंड रेडिओ संकेताचा उपयोग करते, तर नैसर्गिकरीत्या उत्सर्जित होणारे रेडिओ संकेत हे ब्रॉडबॅंडमध्ये सामाविष्ट होतात. म्हणूनच ''वॉव'' हा सिग्नल नॅरोबॅंडमध्ये ग्रहण करणारा असल्याने, त्याला 'एलिअन्स सिग्नल' संबोधले गेले. तसे पाहता हे विश्व अफाट आहे. हायड्रोजन या मूलद्रव्याने आच्छादलेले आहे. त्यामुळे कुठेतरी जीवसृष्टी असेल आणि तीही हायड्रोजनचा उपयोग संकेतासाठी करीत असेल असे शास्त्रज्ञांना वाटते. त्यामुळे चाळीस वर्षानंतर जरी 'वॉव' संकेताचे विश्लेषण झाले असले तरी या क्षेत्रातील उमेद ''वॉव'' संकेताने जिवंत ठेवली होती.

सध्या २०११ मध्ये सेटी प्रकल्प पुन्हा पुनरुज्जीवित होऊन कार्यान्वित झाला आहे. त्यामुळे शास्त्रज्ञ जोमाने परकी संकेतांचा अभ्यास करण्यात गुंतले आहेत. उद्या उठून कदाचित आपल्याला असा संकेत मिळूही शकेल. याव्यतिरिक्त शास्त्रज्ञांनीही १९७४ मध्ये महाकाय 'अॅरिसिबो'या रेडिओ दुर्बिणीचा वापर करून रेडिओ संकेत तारकासमूहांकडे पाठवले आहेत. यामध्ये 'बायनरी'पद्धतीने लिहिलेले चित्र असून, त्यात दशमानपद्धतीच्या संख्या, पृथ्वी, सूर्यमाला, मनुष्यकृती, ॲरिसिबो दुर्बीण, डीएनए अशी चित्रे रेखांकित केली.. हा संदेश प्रकाशाच्या वेगाने प्रक्षेपित केला असून, रेडिओ प्रारणांचा त्यासाठी उपयोग केला आहे. कार्ल सेगन यांनी १९७२मध्ये ''पायोनिअर प्लाक', हे सोन्याचा मुलामा असलेले आयताकृती तबक तयार केले. त्यावर यानाचा उगम, सूर्यमाला, स्त्री व पुरुष आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तित्वाची रेखाचित्रे आहेत. ते ॲल्युमिनियमचे असून अंतराळात सध्या प्रवास करीत आहेत. १९७७मध्ये कार्ल सेगन यांनीच ग्रामोफोनच्या तबकड्या असलेल्या 'गोल्डन रेकॉर्ड' तयार केल्या.

# उद्याने, पदपथ, निवारा शेडमधील लोखंडी आसने चोरीला, गजबजलेल्या वाशीतील घटनेमुळे सीसीटीव्ही यंत्रणेबाबत साशंकता

■ **नवी मुंबई: तृप्ती गोरे**

नवी मुंबई शहरातील सर्वात सुव्यवस्थित विभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाशी विभागात नवी मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक उद्याने, निवारा शेड, पदपथ या ठिकाणी पालिकेने बसवलेली लोखंडी बैठकव्यवस्था उखडून चोरून नेण्याचा प्रकार घडला आहे. पोलीस विभाग व नवी मुंबई महापालिका यांची व्यवस्था फक्त नावापुरती उरली की काय असा संताप नागरिक व्यक्त करू लागले आहेत. शहराच्या सौंदर्यात व देखणेपणात व स्वच्छतेत भर घालण्याचे काम शहरातील नागरिकांसाठी असलेल्या २०० उद्यानांचा मोठा वाटा आहे. नागरिकांसाठी विरंगुळ्याचे ठिकाण तसेच चालणे, व्यायाम करणे यासाठी शहरातील सर्वच उद्यानांत दिवस-रात्र गर्दी असते.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com
**दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३११६४ फॅक्स - २६२०५७८८**

**ई -निविदा सुचना क्र. १२ सन २०२४-२०२५**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक-२६२३११६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या अनुभवी नोंदणीकृत/ अनोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविद प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणर नाही.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगोण कामांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था कुर्ला विद्याविहार येथील आवारातील मैदानामध्ये बास्केट बॉल, हॉली बॉल, बॉक्स क्रिकेट, पळण्याकरिता रनिंग ट्रॅक तसेच महिला व पुरुष प्रसाधनगृह नव्याने बनविनेबाबत | रु. ३,०४,२५,७५०/- |
| २ | मुळगोण कामांतर्गत गोरेगाव (पु) मुबई येथिल फोर्स वन मुख्यालयाच्या हद्दीतील प्रशासकीय इमारतीचे मागील गेट ते बॅफल फायरींग रेंज दरम्यान पक्का डांबरी रस्ता, जोते भिंत (Retaining wall) व भुमीगत गटार इ.कामे करणे | रु. १,६३,९९,७८६/- |

टिपः वरिल "ई" निविदा सूचना https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेबसाईटवर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा उपलब्ध कालावधी- | **दि.१०/०९/२०२४, सकाळी ०९.४५ ते दि १८/०९/२०२४ सायं १७.०० पर्यंत** |
| २ | निविदा पूर्व बैठक काम क्र.१ | **दि.१३/०९/२०२४ रोजी दुपारी १५.००** वाजता मा. मुख्य अभियंता मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई, बांधकाम भवन, ४ था मजला, फोर्ट, मुंबई.४००००१ यांचे दालनात. |
| ३ | निविदा पूर्व बैठक काम क्र.२ | **दि.१३/०९/२०२४ रोजी दुपारी १४.००** वाजता मा. अधिक्षक अभियंता मुंबई (सा.बां.) मंडळ , मुंबई, बांधकाम भवन, ५ वा मजला, फोर्ट, मुंबई.४००००१ यांचे दालनात. |
| ४ | ई-निविदा उघडणे- | **दि.१९/०९/२०२४. सायं १७.०० वाजता** |

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ८६९८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- - 4 SEP 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ २७८९**

# अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे, मुंबई पोलिसांच्या तपासातील त्रुटींवर उच्च न्यायालयाचे बोट

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येशी संबंधित मुंबई पोलिसांनी केलेल्या तपासात अनेक त्रुटी असल्याचे नमूद करून उच्च न्यायालयाने प्रकरणाचा तपास शुक्रवारी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग केला. पोलिसांनी प्रकरणाच्या बऱ्याच पैलूंचा तपासच केलेला नाही. या पैलूंची चौकशी होणे आवश्यक आहे. अन्यथा योग्य तो न्याय देता येणार नाही, असेही न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने प्रकरणाचा तपास सीबीआयकडे वर्ग करताना नमूद केले. ही एक थंड डोक्याने केलेली हत्या असून हत्येचा सगळा घटनाक्रम फेसबुक लाईव्हद्वारे सगळ्यांनी पाहिला आणि या हत्याकांडाने सगळ्याना हादरवून सोडले, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली. हत्येचा सर्व पैलूंनी आणि सर्वतोपरी तपास केल्याचा दावा मुंबई पोलिसांनी केला असला, तरी पुराव्यांचा विचार करता वास्तव वेगळे असल्याचे दिसून येते, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले. या हत्येशी संबंधित संशयास्पद परिस्थितीचा चक्रव्यूह भेदला गेला नाही आणि हत्येच्या महत्त्वाच्या पैलूंचा तपास केला नाही, तर ती न्यायाची फसवणूक करण्यासारखे असेल. तपासातील त्रुटींकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही, अन्यथा न्याय नाकारला जाईल. त्यामुळे, पोलिसांनी तपास न केलेल्या पैलूंचा, एकूणच प्रकरणाचा सखोल तपास करण्याची आवश्यकता आहे, असेही न्यायालयाने



आदेशात म्हटले. घोसाळकर यांची निर्घृण आणि निर्दयीपणे हत्या करण्यात आली आहे. ही एका माजी नगरसेवकाची थंड डोक्याने केलेली हत्या असून ती मॉरिस नोरोन्हा यांच्या कार्यालयातून प्रसारित झालेल्या फेसबुकवर लाईव्हवरून सगळ्यांनी पाहिली, असेही न्यायालयाने म्हटले. घोसाळकर हे एका विशिष्ट राजकीय पक्षाशी संबंधित असले, तरी त्यांच्या पत्नीने या हत्याकांडात इतर काही राजकीय पक्षांचा हात असल्याचा कोणताही आरोप केलेला नाही, हेही न्यायालयाने प्रामुख्याने नमूद केले. दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रकरणांमध्ये तपास सीबीआयकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो. तसेच, राज्यातील तपास यंत्रणांच्या निष्पक्ष कामावर जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी अशा प्रकारे प्रकरणांचा तपास वर्ग करणे आवश्यक आहे. त्यामुळे, पोलिसांवरील आरोपांमुळे हा तपास वर्ग करण्यात आलेला नसल्याचे न्यायमूर्ती डेरे आणि न्यायमूर्ती चांडक यांच्या खंडपीठाने आदेशात प्रामुख्याने नमूद केले. न्यायालयाने सीबीआयच्या विभागीय संचालकांना या प्रकरणाच्या तपासासाठी आयपीएस श्रेणीतील पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासाची कागदपत्रे दोन आठवड्यांत सीबीआयकडे वर्ग करण्याचे आदेश मुंबई पोलिसांना दिले आहेत.

# कंपनी व्यवस्थापकाची ८८ लाखांची सायबर फसवणूक

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

शेअर्समधील गुंतवणुकीच्या नावाखाली कंपनीच्या विक्री व्यवस्थापकाची ८८ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये अशा प्रकारे फसणवूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याप्रकरणी उत्तर प्रादेशिक सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बँक खात्यातील व्यवहाच्या मदतीने याप्रकरणी पोलीस तपास करीत आहेत. तक्रारदार खासगी कंपनीत विक्री व्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत. गेल्या वर्षी त्यांनी समाज माध्यमांवर एक जाहिरात पाहिली होती. त्या जाहिरातीमधील लिंकवर त्यांनी क्लिक केले. त्यानंतर त्यांना प्रसिद्ध कंपनीच्या नावाच्या व्हॉटस ॲप समुहामध्ये सहभागी करण्यात आले. त्या समुहामध्ये शेअर्स खरेदी – विक्रीविषयी माहिती देण्यात येत होती. जून महिन्यात एका महिलने त्यांना संदेश पाठवून शेअर्स खरेदी – विक्रीच्या व्यवहारासाठी एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. ॲप डाऊनलोड झाल्यानंतर केवायसी देखील झाले. एक महिला त्यांना वारंवार बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगत होती. त्यानुसार तक्रारदार ठराविक




रक्कम त्या खात्यात जमा करीत होते. रक्कम पाठवल्यानंतर त्याना खरेदी केलेल्या शेअर्सवर फायदा झाल्याचे दिसत होते. या घटनेनंतर महिलेने तक्रारदारांना त्या समुहामधून बाहेर पडण्यास सांगितले आणि दुसऱ्या समुहामध्ये सामील केले. महिलेने दिलेल्या सूचनेनुसार तक्राराराने एकूण ८८ लाख ५६ हजार रुपये ॲपमध्ये जमा केले. पैसे गुंतवल्यानंतर त्याने जमा झालेला नफा काढण्यासाठी महिलेला विनंती केली. ॲपवर जाऊन नफ्याची रक्कम कशी काढायचे याची माहिती तिने दिली. त्याने मिळालेल्या नफ्यातील काही रक्कम दोन वेळा काढलीही. ॲपवर त्याना एकूण ५ कोटी ११ लाख रुपये जमा झाल्याचे दिसले. कंपनीने शुल्क घेऊन बाकीची रक्कम खात्यात वर्ग करण्यास तक्रारदाराने सांगितले. तेव्हा एका व्यक्तीने आणखी ७० लाख रुपये भरण्यास सांगितले. ती रक्कम भरणे तक्रारदारांना शक्य नव्हते. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्याने त्या कंपनीच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली. तेव्हा त्या नावाची एकही व्यक्ती तेथे कार्यरत नसल्याचे समजले. तसेच कंपनीकडून कोणत्याही प्रकारच्या टिप्स दिल्या जात नसल्याचे त्याना सांगण्यात आले.

# रायगड जिल्ह्यात एकाच कुटुंबातील तिघांची हत्या... नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**■ रायगड : विशेष प्रतिनिधी**

अलिबाग- रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चिकनपाडा गावात एकाच कुटुंबातील तिघांची हत्या करण्यात आली आहे. मृतांमध्ये पती, पत्नी आणि एका मुलाचा समावेश आहे. नेरळ पोलीस ठाण्यात या प्रकरणी अज्ञाताविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी धुळा टेळे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मदन जैतु पाटील वय ३५, अनिशा मदन पाटील वय ३० आणि विनायक मदन पाटील वय १० अशी तिघांची नावे आहे. चिकनपाडा गावात घराच्या मागील भागात असलेल्या



ओढ्यात तिघांचे मृतदेह रविवारी सकाळी आढळून आले. तिघांच्या डोक्यावर धारधार शस्त्राने वार केल्याच्या खूणा आढळून आल्या आहेत. त्यामुळे तिघांची हत्या करून त्यांचे मृतदेह नदीपात्रात टाकण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हत्या झालेली अनिशाही सात महिन्यांची गर्भवती होती अशी माहिती समोर आली आहे. पाटील कुटुंब गेल्या दहा ते १२ वर्षांपासून या परिसरात वास्तव्याला होते. आज पहाटे त्यांचे मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. याबाबतची माहिती मिळताच नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह पंचनामा करून शवविच्छेदनासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.

# वसईत डिजिटल अरेस्टचा आणखी एक बळी, निवृत्त महिला बँक अधिकाऱ्याला २८ लाखांचा गंडा

**■ वसई : विशेष प्रतिनिधी**

डिजिटल अरेस्टच्या नावाखाली फसवणूक करण्याची आणखी एक घटना वसईमध्ये उघडकीस आली आहे. बँकेतून निवृत्त झालेल्या एका वृध्द महिलेला सायबर भामट्यांनी तब्बल २८ लाखांचा गंडा घातला आहे. एकाच आठवड्यातील ही दुसरी घटना आहे. फिर्यादी महिला ७६ वर्षांच्या असून त्या मुंबईच्या वांद्रे येथील पाली हिल परिसरात रहातात. त्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधून व्यवस्थापक पदावरून निवृत्त झाल्या आहेत. त्यांचे पती आजारी असल्याने त्या वसईतील एका नामांकित आश्रमात सध्या पतीच्या उपचारासाठी रहातात.

२३ जुलै रोजी त्यांना एका सायबर भामट्याचा फोन आला. मी रिझर्व बँक ऑफ इंडिया मधून बोलत असून तुमच्या नावाने घेतलेल्या क्रेडिट कार्डचा गैरवापर झाला असल्याचे त्याने सांगितले. तसेच तुमच्यावर हैदराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. या नंतर फिर्यादी यांना हैद्राबाद पोलिसांच्या नावाने व्हिडिओ कॉल आला आणि फिर्यादी यांना 'डिजिटल अरेस्ट' करत असल्याचे सांगितले. तुमच्या सर्व बँक खात्यांवर नजर असून असल्याचे सांगून दिवसभर त्यांना व्हिडिओ कॉ




लच्या माध्यमातून कॅमेऱ्यासमोर 'अटक' करून ठेवली. यातून मार्ग काढण्यासाठी पैशांची मागणी केली. फिर्यादी सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकल्या. त्या चार वेळा वांद्रे येथील आपल्या बँकेत गेल्या आणि २८ लाख रुपये या सायबर भामट्यांना पाठवले.

हा सगळा प्रकार अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत घडला. यानंतर भामट्यांनी फिर्यादी महिलेचे शेअर सर्टिफिकेट ट्रान्सफर करण्यासाठी सांगितले. त्यानंतर मात्र फिर्यादी यांना संशय आला आणि आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी वसई पोलीस ठाण्यात तक्रार दिली. 'डिजिटल अरेस्ट' नावाचा कुठलाही प्रकार नसतो. मात्र लोक त्याला बळी पडत आहेत. फिर्यादी महिला बँकेत मुख्य व्यवस्थापक पदावर कार्यरत होत्या. तरी देखील त्या भामट्याच्या जाळ्यात फसल्या असे वसई पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत आंधळे यांनी सांगितले. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली फसवणूक होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. वसई पोलीस ठाण्यात एकाच आठवड्यात नोंदविण्यात आलेला हा दुसरा गुन्हा आहे. दोन दिवसांपूर्वी एका आयटी तज्ञाला सायबर भामट्यांनी डिजिटल अरेस्टच्या नावाखाली तब्बल दीड कोटी रुपयांचा गंडा घातला होता.

# सावकारीचा गुन्हा दाखल होण्याची भीती, पती-पत्नीचा पोलीस ठाण्यातच आत्महत्येचा प्रयत्न

**■ वसई : विशेष प्रतिनिधी**

सावकारीचा गुन्हा दाखल होणार या भीतीने नायगांव पोलीस ठाण्याच्या आवारातच एक जोडप्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. शुक्रवारी दुपारी ही घटना घडली .दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. नायगांवच्या वाकीपाडा येथे मोहन गोळे (५४) आणि पत्नी गीता (५०) सह राहतात. नालासोपारा येथील सुभाष उत्तेकर यांनी गोळे दांपत्याकडून १० टक्के एकूण ५ लाख रुपये घेतले होते. मात्र उत्तेकर यांनी पैसे परत न केल्याने गोळे दांपत्याने त्यांच्याकडे




पैशांचा तगादा लावला होता. अखेर हे प्रकरण पोलीस ठाण्यात पोहोचले. शुक्रवारी सकाळी गोळे दांपत्य आणि उत्तरेकर या दोघांनाही नायगांव पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यावेळी दोघांमध्ये वाद झाला. याच दरम्यान गोळे दाम्पत्याने अचानकपणे सोबत आणलेले फिनाईल प्राशन केले. पोलिसांनी लगेच त्यांना उपचारासाठी जुचंद्रच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. पती पत्नीने सावकारी गुन्हा दाखल होईल या भीतीपोटी फिनाईल प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली.

# मैत्रिणीकडून गुंगीचे औषध, मित्रांकडून बलात्कार; बदलापुरातील खळबळजनक घटना, आरोपी अटकेत

**■ बदलापूर– विशेष प्रतिनिधी**

मैत्रिणीच्या वाढदिवसासाठी बदलापुरात आलेल्या एका २२ वर्षीय तरूणीला तिच्याच मैत्रिणीने गुंगीचे औषध दिले तर दोन मित्रांनी तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बदलापूर पूर्व पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. पिडीत तरूणीची बदलापूर पूर्वेत राहणाऱ्या भूमिका मेश्राम या तरूणीशी ओळख




झाली होती. तीन दिवसांपूर्वी भूमिकाने आपल्या मैत्रिणीला वाढदिवसासाठी घरी बोलावले होते. त्याचवेळी तिच्या दोन मैत्रांनाही वाढदिवसासाठी पाचारण केले होते. रात्रभर पार्टी केल्यानंतर भूमिकाने तरूणीच्या पेयात गुंगीचे औषध टाकल्याचा आरोप आहे.

# वाहन दुरुस्ती, सुटे भाग विक्री दुकानदारांवर धडक कारवाई

**■ नवी मुंबई : विशेष प्रतिनिधी**

नेरुळ येथील डी. वाय. पाटील महाविद्यालयासमोरील रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांचे सुटे भाग विकणारी दुकाने असून त्या दुकानांच्या समोरच्या पदपथावर अनधिकृत वाहन दुरुस्तीची दुकाने सुरू आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना कायमच करावा लागतो. अखेर तुर्भे पोलिसांनी अशा अनधिकृत गॅरेजवर तुर्भे वाहतूक पोलीस शाखा आणि मनपा अतिक्रमण विभागाच्या वतीने संयुक्त कारवाई गुरुवारी करण्यात आली. यावेळी २२ पेक्षा अधिक गॅरेज व इतर दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक वर्षांनंतर या रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.



डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालय परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस गॅरेज व वाहनांचे सुटे भाग विकणाऱ्या दुकानांसमोर रस्त्यावर वाहने दुरुस्त करतात. त्यामुळे या परिसरात नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो. या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूस अनधिकृत फेरीवालेही विविध वस्तू विक्रीसाठी बसतात. तसेच वाहने ॲक्सेसरीजच्या दुकानात पदपथही वाहन दुरुस्तीकरिता वापरतात. त्यामुळे या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असते. याबाबत वाहन दुरुस्ती दुकाने व वाहनांचे सुटे भाग विकणाऱ्या दुकानदारांना याबाबत वेळोवेळी नोटीस देण्यात आल्या आहेत.

याबाबत नागरिकांच्या वेळोवेळी येणाऱ्या तक्रारींची गंभीर नोंद घेत नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी अशा बाबींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

# मुलुंडमध्ये हिट अँड रन, एकाचा मृत्यू

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

रस्त्यावर फलक लावणाऱ्या दोन गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांना भरधाव वेगात असलेल्या एका बीएमडब्ल्यू मोटारगाडीने जोरदार धडक दिल्याची घटना शनिवारी पहाटे मुलुंड परिसरात घडली. या अपघातात एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला असून दुसऱ्याची प्रकृती गंभीर आहे. मुलुंडच्या गव्हाणपाडा येथील आकृती टॉवरजवळ शनिवारी पहाटे ही घटना घडली. तेथील मुलुंडचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणेश मंडळाच्या मंडपाजवळ प्रीतम थोरात आणि प्रसाद पाटील हे कार्यकर्ते पहाटे चार वाजण्याच्या सुमारास मंडळाचे फलक लावत होते. त्याचवेळी भरधाव वेगात एक बीएमडब्लू मोटारगाडी मुलुंड पूर्वेकडे जात होती. त्यावेळी चालकाचे अचानक गाडीवरील नियंत्रण सुटले आणि त्या गाडीने दोघांना जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर चालकाने मदत न करताच घटनास्थळावरून पोबारा केला. मंडळाच्या इतर कार्यकर्त्यांना याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन दोघांना रुग्णालयात दाखल केले.

# पत्नीशी भांडून पतीनं नदीत मारली उडी; बचावकार्यात अग्निशमन दलाला आले अपयश, पण ८ तासानंतर...

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

पत्नीच्या भांडणाला कंटाळून ४५ वर्षीय पतीने शनिवारी पुण्यातील पवना नदीत उडी घेतली. त्यानंतर संबंधित इसमाला शोधण्यासाठी आठ तास बचाव मोहीम राबविली गेली. मात्र पतीचा शोध घेण्यात अपयश आल्यानंतर बचाव कार्य थांबविले गेले. मात्र आठ तासानंतर पती नदीतून सुखरूप बाहेर आल्यामुळे आता अग्निशमन दल आणि पोलीस स्तब्ध झाले आहेत. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीत इतका वेळ तो जिवंत कसा काय राहिला? असा प्रश्न बचाव पथकाला पडला आहे. तर आपला माणूस जिवंत परतल्यामुळे कुटुंबिय आनंदात आहेत. चिंचवड येथील आबासाहेब केशव पवार (वय ४५) यांनी शनिवारी सकाळी ११ वाजता वाल्हेकरवाडी येथील जाधव घाटावरून पवना नदीत उडी घेतली. यानंतर पवार कुटुंबियांनी याची माहिती




पोलिसांना दिली. तसेच पिंपरी-चिंचवड अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले. पवार हे मद्यपी असून त्यावरून पत्नीशी त्यांचे सतत भांडण होत होते, अशी माहिती घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना देण्यात आली. अग्निशमन दल, नागरी आपत्ती व्यवस्थापन पथक आणि मावळमधील स्वयंसेवी संस्थांनी पवार यांना शोधण्यासाठी बचावकार्य हाती घेतले. अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले यांनी सांगितले की, नदीतील झुडुपाच्या फांदीला आम्हाला पवार यांचे शर्ट लटकल्याचे दिसले. त्यामुळे आम्ही नदीच्या किनारी असलेल्या झाडा-झुडुपातही खूप शोध घेतला. पण पवार कुठेच आढळून आले नाहीत.

आबासाहेब पवार यांना नदीत उडी घेताना त्यांच्या घरातील लोकांनी प्रत्यक्ष पाहिले होते. पवना धरणातून नदीत ४००० क्युसेक पाणी सोडल्यामुळे नदी जोरदार वेगाने दुथडी भरून वाहत होती. नदीत उडी मारल्यानंतर पवार नदीत वाहत गेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. गौतम इंगवले यांनी पुढे सांगितले की, पवार पोहण्यात पटाईत असल्यामुळे ते काही अंतरापर्यंत पोहत गेले. नदीच्या काठावर परतत असताना ते दाट झाडी असलेल्या झुडुपात अडकले.

# उच्च शिक्षित तरुणाची आत्महत्या

**■ ठाणे : विशेष प्रतिनिधी**

ठाण्यातील माजिवडा भागात दीप ठक्कर (२८) या तरुणाने इमारतीच्या आठव्या मजल्यावरून खाली उडी मारत आत्महत्या केली. आत्महत्यापूर्वी त्याने चिठ्ठी लिहिली होती. आशा पूर्ण करता आल्या नाही म्हणून त्याने पालक आणि नातेवाईकांची माफी मागितली आहे. तसेच आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये असे म्हटले आहे. याप्रकरणाची नोंद वर्तकनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. माजिवडा येथील वसंत लॉन्स या इमारतीमधील आठव्या मजल्यावर दीप ठक्कर वास्तव्यास होता. त्याने बी.टेक. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. शुक्रवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास त्याने घरातून खाली उडी मारून आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वर्तकनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आत्महत्येपूर्वी दीप यांनी एक चिठ्ठी लिहीली होती. यात त्याने आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये असे म्हटले आहे. तसेच पालक आणि नातेवाईकांची माफी मागितली आहे. आशा पूर्ण करता आल्या नाहीत, असेही त्याने म्हटले आहे.

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय

Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com

दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६

ई-निविदा सुचना क्र. ८ सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई येथे आर.एम. भट्ट वसतिगृहात स्ट्रक्चरल स्ट्रेंथनिंग आणि नूतनीकरण करणे. | ९,०१,३३,३०४/- |

(एकूण ०१ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०४/०९/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दिनांक ११/०९/२०२४ रोजी १५.०० पर्यंत

निविदा पूर्व बैठक : दिनांक ०९/०९/२०२४ रोजी दुपारी १५.०० वाजता
मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां) प्रादेशिक विभाग,
बांधकाम भवन, ४ था मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक १२/०९/२०२४ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/ ४४५०
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ०२/०९/२०२४

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.


डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/२६२१

# पुतळ्यांची उंची ठरविण्यासाठी धोरणात बदल; तज्ज्ञ समितीची शिफारस, लवकरच १५ दिवसांत घोषणेची शक्यता

■ मुंबई : गणेश बागडे

मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळून झालेल्या दुर्घटनेची दखल घेत आगामी सांस्कृतिक धोरणात राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांची उंची किती असावी याबाबत नियम करण्याबरोबरच शिल्पांची कलात्मकता जोपासण्याची महत्त्वपूर्ण शिफारस तज्ज्ञ समितीने केली आहे. पुढील १५ दिवसांत राज्याचे सांस्कृतिक धोरण जाहीर होणार असून यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण २०१० नंतर प्रथमच जाहीर होणार आहे. धोरण ठरविण्यासाठी कार्याध्यक्ष विनय सहस्त्राबुद्धे यांच्या 'सांस्कृतिक धोरण समिती'ने स्मारकांसाठी सुचविलेल्या शिफारशीमध्ये पुतळ्यासंदर्भातील निकषांवर प्रकाश टाकला आहे. शासनाकडून परिसराचा विचार करता पुतळ्याची उंची किती असावी याबाबत काही नियम ठरवणे आवश्यक आहे, पुतळ्याच्या कलात्मकतेबाबत निकष ठरविण्यात यावेत. शिल्पाच्या परीक्षणासाठी केवळ शासकीय कलाशिक्षण संस्थेतील शासकीय अधिकारी शिक्षक न ठेवता त्यासोबतच एखाद्या तज्ज्ञाची नेमणूक करावी. पुतळ्याला हार घालण्यासाठी काही ठिकाणी



लोखंडी शिड्या उभारण्यात आल्या असून त्यामुळे सौंदर्याला बाधा येत असल्याचे समितीने म्हटले आहे. सांस्कृतिक धोरण ठरविताना १० उपसमित्या नेमण्यात आल्या असून त्यात कारागिरी, भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचनसंस्कृती, दृश्यकला, गडकिल्ले आणि पुरातत्व, लोककला, संगीत, रंगभूमी, नृत्य, चित्रपट, भक्तिसंस्कृती यांचा समावेश होता.

पुतळ्यांसंदर्भातील अहवाल सार्वजनिक बांधकाम विभाग, सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यात आला असून त्यानुसार शिफारशींवर विचार करून अंतिम धोरण तयार होईल. धोरण जाहीर झाल्यानंतर १०-१० वर्षे धोरणाची अंमलबजावणी होत नाही. मात्र सांस्कृतिक धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल. त्यासाठी वेगळी समिती नेमली जाईल.

# महायुतीने राज्य बरबाद करण्याचे काम केले, अर्थमंत्र्यांबाबत मंत्री गुलाबराव पाटलांच्या वक्तव्याचे मी समर्थन करतो –बाळासाहेब थोरात

■ मुंबई : सम्यक कासारे

मंत्री गुलाबराव पाटील अर्थमंत्र्यांबाबत जे बोलले ते बरोबरच असून त्याचे मी समर्थन करतो. केवळ महायुतीतच नाही तर आघाडीचे सरकार असतानाही अर्थ खात्याने मनमानी कारभार केला, असे स्पष्ट मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी अर्थमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता नोंदवले. याशिवाय राज्यातील या पाच वर्षातल्या राजकारणाची सर्वात दुर्दैवी राजकारण म्हणून इतिहासात नोंद होईल अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देत असतानाच उपस्थित पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. यावेळी ते म्हणाले की, आपण स्वतः आठ पंचवार्षिक पाहिलेल्या आहेत. दुर्दैवाने सध्याची पंचवार्षिक राज्यासाठी सर्वात वाईट ठरली. राज्याच्या हिताचा विचार न करता सत्तेच्या स्वार्थासाठी कोणत्याही थराला जाण्याचे वेगवेगळे प्रयोग झाले. राजकारणाचा घसरलेला हा स्तर मोठा वैचारिक वारसा लाभलेल्या राज्यासाठी भूषणावह नाही. अर्थ खात्याचे काम पाचही वर्षात



कधीही न्यायाचे झाले नाही. वास्तविक तुमच्याकडे अर्थ खाते म्हणजे सगळे तुमचेच असे समजण्याचे कारण नसते. सर्व राज्याला समान न्याय या तत्त्वाने कारभार न करता फक्त आपल्या मर्जीतल्या लोकांना वारेमाप निधी दिला गेला. त्यांच्याच विभागात विकास कामे करण्याचा धडाका लावला. मात्र या विकास कामांतही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याने हा पैसा गेला कुठे याचा शोध घेण्याची वेळ आली आहे. निधी वाटपाबाबत पाचही वर्षे भेदभाव केला गेला. आघाडी सरकार असताना वेळोवेळी आपण त्याची तक्रार योग्य ठिकाणी केली होती. स्वातंत्र्यानंतर प्रथमच या खात्यात इतके अयोग्य निर्णय घेतले गेले असा गंभीर आरोपही थोरात यांनी केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चक्रव्यूहात फसल्याबाबतच्या विधानाकडे लक्ष वेधले असता ते म्हणाले की, फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत. आज जी परिस्थिती त्यांच्यावर आली आहे ती त्यांच्याच पक्षाने आणली आहे. राज्यात नको ते उद्योग करण्याची जबाबदारी भाजपाच्या नेतृत्वाने त्यांच्यावर टाकली. पण शेवटी फडणवीसच अडचणीत आले हे आजची वस्तुस्थिती आहे.

# हजारो मच्छीमारांना नव्या हंगामात डिझेल कोट्याची प्रतीक्षा; अनुदानास मंजुरी नसल्याने मच्छीमारांना आर्थिक भुर्दंड

■ उरण : यश सावंत

एक ऑगस्टपासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला आहे. हंगाम सुरू होऊन महिना पूर्ण झाला असतानाही येथील मच्छीमारांना सरकारकडून मिळणाऱ्या डिझेल कोट्याची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे हजारो मच्छीमारांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हा कोटा सरकारने लवकरात लवकर मंजूर करावा, अशी मागणी मच्छीमारांनी शासनाकडे केली आहे. मासेमारी करणाऱ्यांना शासनाकडून मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या बोटींना वर्षाकाठी ३५ हजार लिटर डिझेल दिले जाते. या डिझेलवर शासनाकडून डिझेलवरील व्हॅट किंवा लिटरमागे १८ रुपयांची सूट दिली जात आहे. यालाच मच्छीमार डिझेल परतावा असे




म्हणतात. हे तेलावरील अनुदान शासनाच्या मत्स्य विभागाने त्याचा कोटा मंजूर केल्याशिवाय मिळत नाही. त्यामुळे महिनाभरापासून मच्छीमारांना या कोट्याविना मासेमारी करावी लागत आहे. तर मागील दोन ते तीन महिन्यांचे डिझेलवरील परतावेही थकले आहेत. याचा परिणाम मासेमारीच्या नव्या हंगामावर झाला आहे. शासनाने पावसाळ्यात घातलेली खोल समुद्रातील मासेमारी बंदी उठविण्यात आली आहे. त्यामुळे १ ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाली आहे. यात प्रामुख्याने नारळी पौर्णिमेनंतर समुद्र शांत झाल्याने मासेमारी जोमाने सुरू झाली आहे. तर १५ ऑगस्टपासून मुंबईतील ससून डॉक ऐवजी उरणच्या करंजा बंदरात सुरू झालेल्या मासळी बाजारामुळे खरेदीसाठी मोठी गर्दी होऊ लागली आहे.

# खारफुटीवर घरे बांधल्याच्या तक्रारीच्या तपासणीचे राज्य सरकारला आदेश

■ पनवेल : धनश्री सट्टा

खारघर आणि मानसरोवर येथे सिडको बांधत असलेल्या पंतप्रधान आवास योजनेचे बांधकाम सागरी हद्द नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करून खारफुटी क्षेत्रात होत असल्याने पर्यावरणवाद्यांनी याबाबतची तक्रार पंतप्रधान कार्यालयाकडे केल्याने केंद्रीय पर्यावरण विभागाने याची गंभीर दखल घेतली. संबंधित बांधकामाची चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या पर्यावरण विभागाला दिले आहेत. सिडकोकडून अनेकदा समुद्र किनारपट्टी हद्दीलगत खासगी विकसकांना भूखंड निर्माण करून भाडेतत्त्वांवर दिले जातात. पर्यावरणवाद्यांनी तक्रार केल्यावर याच भूभागाचा मालकी हक्काच्या दाव्याबाबत वाद निर्माण होतो. परंतु अशाच पद्धतीने खाडीक्षेत्रालगत भराव करून भूभाग निर्माण केल्याने पर्यावरणाला थेट धोका होऊन पुराच्या समस्येला काही वर्षांनी सामान्य नागरिकांना तोंड द्यावे लागत असल्याने नवी मुंबईतील पर्यावरण रक्षणासाठी सामाजिक संघटना नेहमी जागरूक असतात. खारफुटीचे संरक्षण करण्यासाठी सरकारी संस्थांकडून पुरेसे प्रयत्न होत नसल्याने सध्या पर्यावरण रक्षणासाठी सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींच्या खांद्यावर ही जबाबदारी वाढल्याचे दिसते. याचाच एक भाग म्हणून सिडको महामंडळ खारघर व मानसरोवर येथे बांधत असलेल्या पंतप्रधान आवास प्रकल्पाचा काही भाग सागरी किनारपट्टी नियंत्रण रेषेलगत असल्याची तक्रार नॅटकनेक्ट फाऊंडेशन या





संस्थेचे संचालक बी. एन. कुमार यांनी केली. ही तक्रार त्यांनी पंतप्रधान कार्यालयाच्या तक्रार निवारण कक्षाच्या केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे केल्यावर केंद्रीय सागरी किनारपट्टी नियंत्रण प्राधिकरणाचे शास्त्रज्ञ पी. राघवन यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत २३ ऑगस्टला महाराष्ट्र समुद्र क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाला या तक्रारीची तपासणी करण्याचे निर्देश दिले. खारघर महागृहनिर्माण प्रकल्पाच्या कुंपणाची भिंत जवळजवळ खारफुटी रेषेला स्पर्श करत असून समुद्रातील वनस्पती आणि प्रकल्पातील अंतर ८ ते २५ मीटरपर्यंत आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. संबंधित महागृहनिर्माण प्रकल्पांना पर्यावरण विभागाची परवानगी मिळविताना दिलेल्या अटींचे हे उल्लंघन असल्याचे तक्रारदार पर्यावरणवाद्यांचे मत आहे.

# 'छत्रपती शिवरायांनी त्याकाळी ईडीप्रमाणे सक्तीची वसुली केली', स्वामी गोविंददेव गिरी यांचे विधान

■ मुंबई : गणेश बागडे

छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत लुटली नव्हती तर सूरतेवर स्वारी केली होती, आपल्या बापाला आपण लुटारू कसे काय म्हणू शकतो? असे विधान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून यावर जोरदार आक्षेप घेत, ऐतिहासिक दाखले देण्याची स्पर्धा सुरू झाली. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी एका वृत्तवाहिनीवर बोलताना छत्रपती शिवरायांनी खंडणी मागितली होती, असे विधान केले. यावर वाद-प्रतिवाद सुरू असतानाच आता श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी छत्रपती शिवरायांच्या सूरत लुटीबाबत वेगळेच विधान केले आहे.

'संपूर्ण राज्य हिंदूंचे आहे, असे मानून छत्रपती शिवाजी महाराज कार्य करत होते. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेदरम्यान जेव्हा महाराजांना आर्थिक चणचण भासत असे



आणि अशावेळी कुठलाही उपाय दिसत नसे. तेव्हा आज ज्याप्रकारे ईडी सक्तीची वसुली करते. त्याचप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळी काही लोकांकडून सक्तीची वसुली केली. हिंदवी स्वराज्यासाठी जो कर भरायला हवा होता, त्याची महाराजांनी सक्तीची वसुली केली', असे मत स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी व्यक्त केले आहे. आज गणेशोत्सवानिमित्त सार्वजनिक मंडळाला भेट दिली असता एका वृत्तवाहिनीशी बोलताना स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी हे विधान केले आहे. त्यामुळे आता भाजपाकडून त्यावर काय प्रतिक्रिया देणार, हे पाहावे लागेल. २२ जानेवारी रोजी जेव्हा अयोध्येत राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला होता. त्या सोहळ्यात बोलत असताना गोविंददेव गिरी महाराजांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा श्रीमान योगी असा उल्लेख केला होता. स्वामी गोविंददेव गिरी म्हणाले होते, 'अमूक एक परिवर्तन आणण्यासाठी एखाद्या महापुरुषाला स्वतःचे जीवन अर्पावे लागते. आज देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपाने एक आदर्श व्यक्ती लाभले.

# 'एवढाच पश्चाताप होतोय तर...', अजित पवारांच्या त्या वक्तव्यावर जितेंद्र आव्हाडांचं आव्हान, म्हणाले...

■ ठाणे : तृप्ती गोरे

लोकसभा निवडणुकीचा पराभव जिव्हारी लागल्यानंतर अजित पवारांनी अनेकदा अनेक गोष्टींची कबुली दिली. बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवारांना उमेदवारी द्यायला नको होती इथपासून कुटुंबातील फूट समाजात स्वीकारला जात नाही, याचा अनुभव मीही घेतलाय इथपर्यंत अजित पवारांची वक्तव्ये कायम चर्चेत राहिली. त्यांच्या या वक्तव्यावरच शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रत्युत्तर दिलंय. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन अजित पवारांवर टीका केली. 'एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा', असं आज अजित पवार म्हणाले. त्यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, 'अजित पवार बारामतीतूनच लढणार. लोकांची मानसिकता संभ्रमावस्थेत नेणं ही एक कला आहे. या कलेचा ते वापर करत आहेत. बारामती त्यांच्यामुळे



उभी राहिली हे त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा गैरसमज आहे. बारामती उभी राहिली ती पवारांमुळे', असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. 'अजित पवारांनी पक्ष हिसकावून घेतला. राजकीय करामती केल्यात. एवढा पश्चाताप घर फोडण्याचा होत असेल तर जाऊन एकदा पत्रकारांना सांगा हा पक्ष मी शरद पवारांच्या घरातून चोरून आणला आहे, आणि मी आता त्यांना देऊन टाकतो. मी माझी निशाणी घेऊन लढतो', असं आव्हान जितेंद्र आव्हाडांनी दिलं.

'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांची दादागिरी होती. एकही माणूस त्यांच्याविरोधात ब्र सुद्धा काढायचा नाही. तो त्यांना घाबरून नाही. ही तक्रार पवारांपर्यंत गेली तर पवार नाराज होतील, या भीतीने. आता तसं नाहीय. आता तिथे ना पवार साहेब आहेत आणि कोणी कोणाला घाबरत नाही', असंही ते म्हणाले. 'वेळोवेळीच्या मुख्यमंत्र्यांचा अजित पवारांनी केलेला जाहीर अपमान आम्ही सर्वांनी पाहिला आहे. पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण यांचा त्यांनी अपमान केलाय.

# कोपरखैरणे विभाग कार्यालय परिसरातही खड्डे, डासांचा प्रादुर्भाव; नागरिक, कर्मचाऱ्यांना पाठदुखीचा त्रास

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

शहरात मुख्य रस्ते वगळता अंतर्गत रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. हे खड्डे गणपती सणापूर्वी बुजवण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले असले तरी कोपरखैरणे विभाग कार्यालय इमारत आवारात प्रचंड खड्डे पडले आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने पाऊस पडून थांबला तरी दिवसभर आवारात तळे साचलेले असते. यामुळे विभाग कार्यालयात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

इमारतीत असणाऱ्या इतर आस्थापनांनी प्रतिक्रिया दिली नाही. नवी मुंबईतील आठ नोडपैकी कोपरखैरणे नोडमध्ये पदपथांची अवस्था दयनीय झाली आहे. याबाबत वृत्त प्रसिद्ध होताच दुरुस्ती सुरू करण्यात आली आहे. मात्र गेले अनेक महिने कोपरखैरणे नोडचा गाडा ज्या इमारतीतून हाकला जातो त्या इमारतीच्या आवारात प्रचंड खड्डे पडले आहेत. वाहनतळामधून वाहन बाहेर काढताना येणाऱ्या एका वळणावर सर्वाधिक आणि मोठे



खड्डे पडले असून चारचाकी गाडीसुद्धा अतिशय सावकाश चालवावी लागते. पावसाचे पाणी साठते तेव्हा कुठे खड्डे आहेत हे लक्षात न आल्याने त्याचा त्रास सर्वाधिक दुचाकीस्वारांना होतो. वाहन चालवताना अचानक खड्ड्यातून गाडी गेल्याने पाठीच्या मणक्यांचा त्रास सुरू झाल्याचे विभाग कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांनी सांगितले.

# वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर सरकारी सेवेतून बरखास्त; केंद्र सरकारची मोठी कारवाई

■ मुंबई : विशाल कारंडे

केंद्र सरकारने वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना सरकारी सेवेतून बरखास्त करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे. तसेच हा निर्णय तत्काळ प्रभावाने लागू होईल, असेही सरकारने म्हटलं आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. पीटीआयने सुत्रांच्या हवाल्याने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

यूपीएससीकडून यापूर्वीच पूजा खेडकर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. ३१ जुलै रोजी यूपीएससीने त्यांची उमेदवारी रद्द केली होती. तसेच त्यांना यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आलं होतं. याशिवाय पूज खेडकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही यूपीएससीकडून देण्यात आले होते. पूजा खेडकर यांच्यावर दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानंतर त्यांनी दिल्लीच्या पतियाला कोर्टात अटकपूर्व



जामिनासाठी अर्ज केला होता. पण हा अर्ज आज न्यायालयाने फेटाळला होता. यावेळी झालेल्या सुनावणीत 'जिल्हाधिकाऱ्यांवर लैंगिक शोषणाचे आरोप केले म्हणून आपल्याला लक्ष्य केलं जात आहे', असा दावा पूजा खेडकर यांच्यावतीने करण्यात आला होता. तर यूपीएससीनं पूजा खेडकर यांनी फक्त आम्हालाच नाही, तर संपूर्ण समाजाला फसवलं आहे, असं म्हणत त्यांच्या अटकेची मागणी केली होती. या संपूर्ण प्रकरणानंतर पूजा खेडकर यांनी दिल्ली उच्च न्यायालयात एम्स रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यास तयार असल्याचं म्हटलं होतं. त्यांचं अपंगत्व प्रमाणपत्र बनावट असल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर त्यांनी ही तपासणी करण्याची तयारी दर्शवली होती. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्याचा ठपका पूजा खेडकर यांच्यावर आधी ठेवण्यात आला होता. त्यानंतर हे प्रकरण चर्चेत आलं होतं. पुढे पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यंगत्वाबाबत चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला होता.

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा दोन वर्षांत आठ लाखांपेक्षा अधिक मातांनी घेतला लाभ!

■ मुंबई : गणेश बागडे

गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान राज्यातील ८,३७,३९९ गर्भवती महिला व मतांनी लाभ घेतला आहे.

भारतात दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत मजुरीसाठी काम करावे लागते तसेच प्रसुतीनंतरही शारीरिक क्षमता नसताना मजुरीचे काम करावे लागते. परिणामी अशा गर्भवती माता कुपोषित राहून त्यांचे तसेच नवजात बाळ कुपोषित वा कमी वजनाचे जन्माला येते. यातून आरोग्याच्या समस्या निर्माण होऊन माता व बालमृत्यूचे प्रमाण वाढते हे लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने २०१७ पासून संपूर्ण देशात प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर बुडीत मजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामुळे गर्भवती महिला व मातांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहन तसेच पुरेशी विश्रांती मिळू शकते. यातून माता व नवजात बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असून या योजनेत केंद्राचा सहभाग ६० टक्के तर राज्यांचा वाटा ४० टक्के असे निश्चित करण्यात आले आहे. मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसात गर्भधारणेची नोंद केल्यानंतर एक हजार रुपये तसेच गर्भधारणेच्या सहा महिन्यांनंतर दोन हजार आणि प्रसुतीनंतर अपत्याची नोंदणी व पहिल्या लसीकरणानंतर दोन हजार रुपये दिले जातात. गरोदरपणात आणि बाळंतपणात महिलांना आरोग्य सेवा-सुविधा आणि प्रोत्साहनाच्या माध्यमातून कुपोषणाचा प्रभाव कमी करणे आणि माता व बाल आरोग्य सुधारणे हा प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा उद्देश आहे. या योजनेंतर्गत पहिल्या अपत्यासाठी तीन हप्त्यांत ५,००० रुपयांची मदत दिली जाते. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर एक रकमी ६,००० रुपयांची मदत दिली जाते. त्यासाठी जन्म दाखला




असणे आवश्यक असून बालकाचे १४ आठवड्यांर्यंतचे लसीकरण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात २०१७ पासून २०२२ पर्यंत एकूण ३४ लाख ९४४९ गर्भवती महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून यासाठी १४०३ कोटी ५० लाख ४६ हजार रुपये देण्यात आल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. केंद्र शासनाच्या १४ जुलै २०२२ रोजीच्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृ वंदना योजना – २ नव्या स्वरुपात देशात लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये पूर्वी केवळ पहिल्या अपत्यासाठी लाभ मिळत असे, मात्र आता नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार दुसरे अपत्य मुलगी जन्माला आल्यानंतरच्या लाभार्थीचा देखील या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. नवीन निकष पात्र लाभार्थी शोधून आशा किंवा अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थीची ऑनलाइन पीएमएमव्हीवाय सॉफ्टवेअरमध्ये लाभार्थी नोंदणी केली जाते. यासाठी शासनाने निकष निश्चित केले असून त्यात ज्या महिलांचे कौटुंबिक उत्पन्न आठ लाखापेक्षा कमी असेल तसेच अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच महिला, ज्या महिला ४० टक्के किंवा पूर्ण दिव्यांग आहेत, पिवळी शिधापत्रिका असलेली महिला तसेच मनरेगाचे जॉब कार्ड असलेली महिला पात्र आहेत. याशिवाय आधारकार्ड तसेच बँकेत खाते असणे आवश्यक आहे.